# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायै समर्पिता

## दिनांक १०-०५-२०१६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२०) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक १० मे २०१६ रोजी (का.प.क्र.२०) मा.महापौर श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.१५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त, श्री.रमेश पवार नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
६. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
७. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
८. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
९. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
१०. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
११. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१२. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१३. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१४. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१५. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१६. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१७. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
१८. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
१९. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२०. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२१. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२२. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२३. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२४. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२५. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२६. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत

२७. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
२८. स.स. श्री.चित्ते नितीन रमन
२९. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
३०. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३१. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३२. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३३. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
३४. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
३५. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
३६. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
३७. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
३८. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
३९. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४०. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
४१. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४२. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४३. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
४४. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
४५. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
४६. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
४७. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
४८. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
४९. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५०. स.स. श्री.शेख जफर अखतर
५१. स.स. श्री.जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
५२. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
५३. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
५४. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
५५. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
५६. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
५७. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
५८. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
५९. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६०. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
६१. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
६२. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
६३. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
६४. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
६५. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद

६६. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
६७. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
६८. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
६९. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
७०. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
७१. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
७२. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
७३. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
७४. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
७५. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
७६. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
७७. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
७८. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
७९. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
८०. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
८१. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
८२. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
८३. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
८४. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
८५. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
८६. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
८७. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
८८. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
८९. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
९०. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
९१. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
९२. स.स.कु.जमादार सायली भागवत

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.राजेंद्र जंजाळ :सकाळच्या सत्रामधे कार्यक्रम पत्रिका-१९ घेण्यात आली. त्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे :आताच सुचना केल्याप्रमाणे इतिवृत्त मंजूर करावे.

मा.महापौर :इतिवृत्तांत मंजूर करण्यात येते.

**प्रश्न क्रमांक ४५६ :स.सदस्या श्रीमती सीमा खरात**

श्रीमती सिमा खरात :सलीम अली सरोवर संदर्भात पक्षीमित्र संघटनेने नाव चालविण्यावर बंदी आणलेली आहे. परंतु साफसफाई किंवा जॉगींग ट्रॅकचे काम करण्यास बंदी नाही. या परीसरात बांधकाम करण्यासाठी ४.७८ कोटी खर्च केला. असे म्हटले. परीसराच्या स्वच्छतेसाठी काय उपाययोजना केली आहे? विचारले होते उत्तर असे मिळाले की, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सध्या परीसर खुला नाही. उद्यान विभागामार्फत माळी कर्मचारी आहे. कालांतराने साफसफाई केली जाते असे म्हटले. २९ एप्रिल २०१६ ला बातमी आली की, या सरोवराची वाताहत झालेली आहे. तेथील दिवे बंद आहे, मद्यपी दारू पितात. असे असेल तर केलेला खर्च वाया गेला की काय? यावर उत्तर मिळाले की, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. एवढा मोठा खर्च केला, तर तो वायाच गेलेला आहे, असे वाटते. सायंकाळी ५.४५ वा. मी तेथील फोटो काढले. साफसफाई होत नाही. ४५७ चे उत्तर दिले की, २०१२ पासून प्लॅन्ट कार्यरत आहे. दरमहा विद्युत देयक ३.२५ लक्ष दिले जाते. एप्रिल २०१६ पर्यत १.४६ कोटी अदा केले, असे असतांना तेथे ५.४५ वा.दिवे बंद असतात. साफसफाई नाही, झाडे नष्ट झाली, जॉगींग ट्रॅकवर घाण साचली, तर केलेला खर्च कशासाठी होतो, तेथे स्वच्छता नाही, सुरक्षा रक्षक नाही. माळी काय काम करतात? आज रोजी तेथे कुलूप आहे. मला दिलेले उत्तर समाधानकारक नाही

श्री.नितीन चित्ते :एन-१२ तलावाच्या बाजूला विहिर आहे. तेथून स्वामी विवेकानंद उद्यानास पाणी द्यावे. त्या विहिरीवरून पाणी सिडकोच्या नर्सरीला जाते.

शहर अभियंता :एसटीपी प्लॅन्ट चालू आहे. त्यांचे बील समावेश करून संबंधीत अधिकारी यांनी उत्तर दिले. प्लॅन्ट व सलीम अली सरोवर हे दोन मुद्दे वेगवेगळे आहे. तेथील साफसफाई वेळेवर होईल. चुकीचे उत्तर दिले गेले आहे. खुलासा मागविण्यात येईल. स्वामी विवेकानंद गार्डनला पाणी घेतले जाईल.

श्रीमती सिमा खरात :चुकीचे उत्तर ज्यांनी दिले, त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी. चुकीची माहिती देणे बरोबर नाही. स्वामी विवेकानंद उद्यान मधील झाडाला पाणी देण्यात यावे.

श्री.गोकुळसिंग मलके :माझ्या वार्डात लाईट लावून देणार होते.

मा.महापौर :कार्यवाही करावी.

**प्रश्न क्रमांक ४६१ :स. श्री. राजगौरव वानखेडे**

श्री.राजगौरव वानखेडे :प्रश्न केला होता की, मंजूर रेखांकन असलेल्या ठिकाणी सुविधा पुरविणे आवश्यक आहे का? उत्तर दिले की, तेथे सुविधा पुरविणे अपेक्षीत आहे. हा प्रश्न सर्व वार्डातील आहे. ले-आऊट होते. नागरीक बेटरमेंन्ट चार्जेस भरल्यानंतर किती दिवसात सुविधा देणे आवश्यक असते?

नगर रचनाकार(श्री.निकम) बेटरमेन्ट चार्जेस भरल्यानंतर तातडीच्या तेथे सुविधा द्यायला पाहिजे.

श्री.राजगौरव वानखेडे :माझ्या वार्डात १९९५ चे ले-आऊट आहे तेथे रस्ते, ड्रेनेज, पाणी व इतर सुविधा नाही. त्या सोसायटींनी बेंटरमेन्ट चार्जेस भरले आहे. सुविधा मिळत नाही. ले-आऊट संदर्भात न्यायालयाचे काही निर्देश आले का? बजेट नाही एक,दुसरे कारण दाखवून सुविधा दिल्या जात नाही.

नगररचनाकार(श्री.निकम):माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल. मा.न्यायालयाचे निर्देश बाबत विधी विभाग माहिती देईल.

विधी सल्लागार :श्री.सोनल जोशी यांची याचीका दाखल झाली होती. मा.न्यायालयाने त्यात ४ मे रोजी ऑर्डर केलेली आहे. एमआरटीपी ॲक्ट-१२४ जे नुसार महापालिकेने अशा ठिकाणी सुविधा देणे संदर्भात स्वतंत्र अकाऊंट ओपन केले पाहिजे. ते केलेले आहे. ते केंव्हा ओपन केले? लेखाधिकारी सांगतील.

प्र.मुख्यलेखाधिकारी :मा.उच्च न्यायालयाच्या निकालानुसार अकाऊंट ओपन केले. निकालामध्ये स्पष्ट म्हटले होते की, एमआरटीपी १२४ चे जे नुसार विकास निधी ठेवावा. प्राधिकरण ज्या प्रमाणे सांगेल त्यानुसार खर्च करावा. जे लोक बेटरमेंन्ट व शहर विकास चार्जेस भरतील, ती रक्कम स्वतंत्र ठेवावी. असे मा.न्यायालयाने म्हटले आहे. मागिल वर्षीपासून ती रक्कम ठेवलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सन-१९९५ पासून माझ्या वार्डात लोकांनी बेंटरमेंन्ट चार्जेस भरणा केले. तेथे पाण्याची सुविधा कधी देणार आहे.

प्र.मा.आयुक्त :ॲक्ट मध्येच आहे. त्यानुसार सुविधा द्यायला पाहिजे.

श्री.राजेंद्र जंजाळ :ॲक्ट मध्ये आहे, तर कोर्टाच्या आदेशाची वाट पाहता काय?

मा.महापौर :ज्या ले-आऊट मधील व सोसायटीच्या माध्यमातून बेंटरमेंन्ट चार्जेस जमा झाले ते त्याच सोसायटीमध्ये खर्च करण्यासाठी कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. तो निधी स्वतंत्र खात्यात जमा असावा. अशा ठिकाणी कामे सुरू करावी. अंदाजपत्रक तयार करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :जमा झालेली रक्कम कुठे खर्च केले. जेथून विकास शुल्क भरणा झाला. तेथे भौगोलिक सुविधा देणे महापालिकेचे कर्तव्य आहे.

मुख्य लेखाधिकारी :विकास कामासाठीचा फंड स्थापन केला. तो विकास कामासाठी खर्च करणार आहे. १६ कोटी जमा होते. जसजसे डीपी प्लॅन व ले-आऊट मधील कामा विषयी बिल येते. तेवढेच त्यातून खर्च करतो. मा.न्यायालयाने १२४ जे प्रमाणे खर्च करावे व प्राधिकृत अधिकारी यांनी तशी कार्यवाही करावी असे म्हटले.

श्री.राजगौरव वानखेडे :उदा. होणाजीनगर भागातून ५० लक्ष बेंटरमेंन्ट चार्जेस मिळाले. तेथील काम न होता दुसरीकडे खर्च केले. आलेल्या रक्कमेच्या प्रमाणातच अशा ठिकाणी खर्च करावे.

श्री.विजय औताडे :वार्ड-७ मधून अनेक ले-आऊट मंजुर झाले. तेथून २५ कोटी बेंटरमेंन्ट चार्जेस मनपास मिळाले. असतांना सादर झालेल्या संचिका मंजूर होत नाही.

श्री.गजानन बारवाल :अनेक जुन्या सोसायटीने पैसे भरले. त्यावेळी तेवढया रक्कमेत तेथे विकास झाला असतात. आता मोठी रक्कम लागणार आहे. यास मनपाच जबाबदार आहे. अशा भागाची माहिती घेऊन विकास करावा.

शहर अभियंता :जो ले-आऊट मंजूर होतो. त्या व्यक्तीने उदा. सन-२०१६ पर्यत बेटरमेन्ट चार्जेस भरणा केले असेल. आजचा रेट ७२० स्क्वे.फुट असेल. त्यानुसार भरणा केलेले पैसे तेथे विकास करण्यासाठी राखीव ठेवले पाहिजे. आताच म्हटल्या प्रमाणे अनेक भागातून विकास शुल्क जमा झाले. परंतु ते इतरत्र खर्च केले गेले. जमा झालेली रक्कम स्वतंत्ररित्या ठेवली पाहिजे. जुन्या रेट नुसार विकास शुल्क भरणा केले असेल व आता तेथे काम करायचे झाल्यास महापालिकेचे

त्यात नुकसान होते. जेंव्हाच्या तेंव्हा ते काम व्हायला पाहिजे. विकास शुल्क घेतले असेल तर तेथे काम करणे आवश्यक आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :हा निधी दुसऱ्या कामावर खर्च केला आहे का?

शहर अभियंता :लेखा विभागाने तो निधी दुसऱ्या कामावर खर्च केला असेल.

मा.महापौर :ज्या भागातून विकास शुल्क व शहर विकास शुल्क जमा झाला असेल, तो निधी त्याच भागासाठी खर्च करण्या बाबत कार्यवाही करावी. प्रशासनाने नियोजन करावे. होनाजीनगर, रामेश्वर नगर, हर्सुल भागात अशा ठिकाणी पाण्याची व्यवस्था करावी. हर्सुल तलावाची खोली वाढण्यासाठी गाळ काढणे आवश्यक आहे. शासनाकडे आणखी यासाठी निधी मागवावा. जे की १८ वार्डाचा पाण्याचा प्रश्न सुटेल. आताच स.सदस्य श्री.औताडे यांनी सुचना केल्यानुसार ज्या भागातील सोसायटींनी बेटरमेन्ट चार्जेस भरणा केले तेथे काम करण्याचे नियोजन करावे.

शहर अभियंता :स.सदस्यांचे असे म्हणणे होते की, हे काम युआयडीएसएसएमटी मधून करावे. परंतु त्यातून हे काम करता येणार नाही. मनपा फंडातून केले जाईल.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :स.सदस्य श्री.औताडे यांनी म्हटल्यानुसार त्याचे वार्डातील ६३ ले-आऊट मंजूर आहे. तेथे ड्रेनेज व इतर कामे करण्याची तयारी केली होती. परंतु ज्या योजनेतून काम करणार होतो त्यात येणाऱ्या निधीत तूट आलेली आहे हा लिगल एरिया आहे. मनपा फंडातून काम करावे लागेल.

श्री.राजगौरव वानखेडे :जेथे गरज नाही तेथे कामे केली. जेथे लिगल भाग आहे, तेथे कामे होत नाही चौकशी करावी.

मा.महापौर :उद्याच स.सदस्य यांचे वार्डात पाहणी केली जाईल. शहर अभियंता यांनीही उपस्थित रहावे.

श्री.विजय औताडे :हर्सुल टी-पॉईन्ट पासून जाणारा सर्वीस रोड आहे. तेथे लोकांनी अतिक्रमण केले ते काढावे.

**प्रश्न क्रमांक ४६३ स.श्रीमती आशा निकाळजे**

श्रीमती आशा निकाळजे :मुलींचा जन्मदर किती आहे? किती असायला पाहिजे? प्रश्न केल्यानुसार माहिती दिली नाही. अर्धवट माहिती दिली. माझ्या माहिती प्रमाणे जानेवारी ते एप्रिल १६ पर्यत रिपोर्टच नाही.

आरोग्य वैद्य.अधिकारी :सन २०११ ते सन २०१५ पर्यंतची दर वर्षाची माहिती उपलब्ध आहे. सिव्हील हॉस्पीटलमध्ये पुर्ण जिल्ह्याची माहिती उपलब्ध आहे. सन-२०११ मध्ये ८५२ जन्मदर होता. सन-२०१२ मध्ये ८७८, सन-२०१३ मध्ये ९३३, सन-२०१४ मध्ये ९१४, सन-२०१५ मध्ये ९१३ दर महिन्याची माहिती आहे. या विभागास उशीरा उपलब्ध झाली. नवीन वार्ड सातारा-देवळाई आलेले आहे. येथील माहिती दोन दिवसांत उपलब्ध करून दिली जाईल. जानेवारी ते एप्रिल-२०१६ पर्यंतची ९२,९९ टक्केवारी आहे. वार्ड-एफ ची माहिती घेऊन दिली जाईल.

श्रीमती आशा निकाळजे :एमसीटीएस ची माहिती साधारणत: अशी असेल असे मला उत्तर दिले.

आरोग्य वैद्य. अधिकारी :सर्व सेन्टरवर माहिती भरणे चालू आहे. नेटचा प्रॉब्लेम येतो. उशीर लागतो.

मा.महापौर :स.सदस्या श्रीमती आशा निकाळजे यांना संबंधीत अधिकारी यांनी सर्व सविस्तर माहिती द्यावी.

**प्रश्न क्रमांक ४६७** **:श्री.गंगाधर नामदेव ढगे**

कर निर्धा.व संकलक :माहिती दिली आहे. संबंधीतांकडे थकबाकी नाही. चालू वर्षाचेही त्यांनी ९०.७८ लक्ष एप्रिल मध्ये भरलेला आहे. त्यावेळी १० टक्के सुट असते. ५.७५ लक्ष बाकी आहे.

श्री.गंगाधर ढगे :एमजीएम संस्थेने सामाजिक वापरासाठी असलेल्या भुखंडावर हॉटेल, रेस्टारंन्ट क्लब ज्यु.कॉलेज आर्ट कॉमर्स सायन्स कॉलेज, इंग्रजी स्कूल दुध डेअरी जलतरण तलाव खादी व पैठणी केंद्र चालवितात. या सर्व उपक्रमांना सिडकोने अनधिकृत म्हणून संस्थेला पत्र दिले आहे. व्यावसायिक म्हणून पैसे कमवित असेल तर टॅक्स कोणता आकारला जातो. अनधिकृत इमारत बांधली चौकशी करावी कमर्शियल टॅक्स लावावा.

श्री.विकास एडके :ॲसेसमेंन्ट केंव्हा झाले.

कर निर्धा.व संकलक :जुने ॲसेसमेंन्ट आहे. सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार ३७.५ प्रमाणे कर लावतो.

मा.महापौर :कमर्शियल वापर तेथे होत असेल तर योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा.

श्री.अब्दुल नाईकवाडी :तेथे एक ग्राऊंड आहे. एका कार्यक्रमासाठी ८५ हजार शुल्क घेतात. स्विमींग पूल कमर्शियल आहे. तेथे पाणी दिले जाते. सीसीटीव्ही कॅमेरा आहे. तपासणी करावी किती पाणी देतो?

कार्य.अभियंता(पापू) :पिण्यासाठी त्यांचे टॅंकरमध्ये पाणी भरून देतो. ४-५ टॅंकर जातात. १२ हजार लि.पाणी जाते. त्याचे पैसे घेतो.

प्र.मा.आयुक्त :या संस्थेला कमर्शियल टॅक्स लावला जाईल. पाणी किती दिले जाते. प्रमाणाकानुसार पाणी देऊ. कॉम्प्लॅक्स मध्ये परवानगी कशासाठी आहे? ती छाननी केली जाईल.

श्री.गंगाधर ढगे :दोन महिन्यापूर्वी पत्र दिले. सहा टेबलवर संचिका फिरते. कार्यवाही होत नाही. तेथे रस्ते अडवले आहे. एफएसआय वाढवून दिला. ५-६ मुद्देबाबत निवेदन दिले होते. नगररचना मध्ये संचिका आहे.

प्र.मा.आयुक्त :संचिकाबाबत कार्यवाही होत नसेल. अतिक्रमण नगर रचना व पाणीपुरवठा विभागाची एकत्रित बैठक घेऊन सर्व माहिती घेतली जाईल.

**प्रश्न क्रमांक ४६९** **: श्री.गंगाधर नामदेव ढगे**

श्री.गंगाधर ढगे :प्रश्न केल्यानुसार उत्तर दिले की, या संस्थेने अग्निप्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाय योजनाचे काम पुर्ण करण्यात आले व उर्वरित काम अंतिम टप्यात आहे. दिनांक २२-०५-२०१५ रोजी अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले असे म्हटले. भोगवटा प्रमाणपत्राची तारीख ०८-०७-२०१५ आहे. खरे प्रमाणपत्र कोणते खुलासा करावा. काम न होता कम्प्लीशन दिले.

प्र.मा.आयुक्त :सर्व कागद पत्राची प्रत माझ्याकडे द्यावी. तपासणी केली जाईल.

मा.महापौर :स्थळ पाहणी करावी कार्यवाही करावी.

**प्रश्न क्रमांक ४७२** **:श्री.कादरी जमीर अहेमद**

श्री.राजेंद्र जंजाळ :सविस्तर माहिती घ्यावी.यापुर्वी विद्युत लाईट संदर्भात चर्चा झाली आहे.

उपअभियंता(विदयु.) :विस्तृत स्वरुपात माहिती आहे. ८-१० दिवसात माहिती देण्यात येईल.

श्री.भगवान घडमोडे :यावर चर्चा झाली होती. अधिकारी दिरंगाई करीत असेल तर कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :सन-२०१४ पासून किती पोल काढले? किती फिटींग लावले? याचा हिशोब ठेवत नसेल व करोडो रूपये खर्च होत असेल तर कुणावर विश्वास ठेवायचा?

मा.उपमहापौर :जुने काढलेले पोल वापरात आणले. त्याचे नवीन बसविले म्हणून बील काढले. त्यामूळे पोल मोजता येत नाही. शहर अभियंता यांचे यावर नियंत्रण नाही.

श्री.नासेर सिद्यीकी :यावर चर्चा झाली होती. अधिकारी उत्तर देत नाही.

श्री.राजेंद जंजाळ :पोल, लाईट फिटींगचा हिशोब घ्यावा. माहिती देत नसेल तर अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी. त्यांचे पगारातून वसुल करावे.

शहर अभियंता :४७२ प्रश्न आहे. विद्युत विभागात कर्मचारी कमी आहे. दोन ज्यु.इंजिनिअर आहे. माहिती घेणेसाठी वेळ लागणार आहे. हा विभाग सुधारण्याची गरज आहे. एकाच व्यक्तीकडून या विभागाचे कामकाज बघीतले जात नाही.

मा.उपमहापौर :कर्मचारी कमी असे सांगता. परंतु लाईट न लागता बील काढले जाते त्यासाठी कोठून कर्मचारी असतात.

श्री.राजेंद्र जंजाळ :स्टॉक रजिस्टर असेल, त्यातून माहिती देता येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :सर्वात जास्त ए-१ ची कामे विद्युत विभागाचे आहे. त्यावेळी कर्मचारी असतात.

शहर अभियंता :सन-१९८५ ला १० अभियंते होते. आता १० पट शहर वाढले. २ अभियंते आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :किती दिवसापासून ठेकेदाराकडून काम करतो? लाईनमन काय काम करतात? क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यावरील किती लाईट लावले? पोल लावले माहिती द्यावी. श्री.काझी यांचेकडे चौकशी दिली होती. अहवाल आणावा.

शहर अभियंता :८-१० लाईनमन आहे. पाणीपुरवठा विभागात काही कर्मचारी दिले गेले आहे. काहींना वार्डात कामासाठी जावे लागते. एक-दोन दिवसात लाईनमनची बैठक घेतो.

**प्रश्न क्रमांक ४७५ :श्रीमती खान सायरा बानो अजमल**

श्रीमती सायरा खान :या प्रश्नाची माहिती मिळाली नाही.

उपआयुक्त (आस्थापना):प्रश्न माझेपर्यत आलेला नाही. तरी पण माहिती घेण्यात येईल. प्रशासकीय अहवाल ५१ (२) नुसार स्थायी समितीला सादर केला पाहिजे. मान्यता घेतली पाहिजे. जो प्रश्न केला आहे त्याची माहिती घेतली जाईल. लेखी कळविले जाईल.

**प्रश्न कमांक ४७६ : श्रीमती खान सायरा बानो अजमल**

श्रीमती सायरा बानो खान:शहागंज पाण्याच्या टाकीलगत अग्निशमन उपकेंद्र केंव्हा सुरू करणार आहे? माहिती द्यावी.

प्र.मा.आयुक्त :स.सदस्या यांना उत्तर दिलेले आहे. तेथील जागा ओपन करून घेतली आहे. तेथे अग्निशमनची व्यवस्था करणार होतो. परंतु कर्मचारी संख्या कमी आहे. आऊट सोर्सीगवर जवान कर्मचारी मिळतील. तेव्हा पुढील कार्यवाही करता येईल.

श्रीमती सायरा खान :५ अग्निशमन केंद्र सुरू करण्यासाठी सन-२००९ मध्ये ६५ टक्के निधी शासनाकडून प्राप्त झाला होता. उपकेंद्र का सुरू केले नाही व शहागंज येथील जागेमधील एका व्यक्तीचे अतिक्रमण का हटविले नाही.

शहर अभियंता :शासनाने १,७८,५००००/- इतका निधी दिला होता. पाच अग्निशमन केंद्र करायचे होते. त्यात विविध कामे होती. रुपये ५.१० कोटीचा प्लॅन होता. यातून

रुपये ९३ लक्ष तातडीचे ऑपरेशन सेंटर यासाठी पदमपूरा येथे खर्च केले. मनपाचा जो रुपये ३.६६ कोटीचा हिस्सा होता. ती रक्कम बजेटमध्ये तरतूद करण्या बाबत वारंवार कळवून उपलब्ध झाले नाही. केवळ शहांगज येथील उपकेंद्र करण्याचाच हा विषय नव्हता. तरी सुध्दा संचिका सादर केली. एजन्सी फिक्स केली होती. १ कोटीचे टेंडर काढले होते. जागा उपलब्ध झाली. मा.आयुक्त यांना नगर रचनाच्या संदर्भात खास अधिकार आहे. त्यानुसार शहांगज भागात अग्निशमन केंद्र बांधण्याचे नियोजन केले आहे. २०१३ साली वर्कऑर्डर दिली होती. तेंव्हाचे दर परवडत नाही, असे ठेकेदाराने लिहून दिले आहे. संचिका सादर केली. नवीन टेंडर करून हे काम करावे असे सादर केले. कार्यवाही होईल ०२ महिन्याचा वेळ लागेल.

श्री.गजानन बारवाल :पदमपूरा येथील ४ वर्षापासून काम बंद आहे. त्वरीत तेथील काम सुरू करावे.

शहर अभिंयता :५ ठिकाणी अग्निशमन केंद्र सुरू करायचे. ते मनपा फंडातून करावे लागेल. शासनाने ३५ टक्के दिलेला आहे. त्यातून निधी ९३ लक्ष खर्च झाला आहे.

श्री.फेरोज खान :शहागंज येथील केंद्र न करता पदमपूरा येथे त्या निधीतून इमारत बांधली. तेथून शहांगज येथून गाडी येण्यास १ तास लागतो. शहागंज अग्निशमन केंद्र असावे.

शहर अभियंता :टेंडर काढून कार्यवाही करणार आहोत.

**प्रश्न क्रमांक ४७८ :स.श्रीमती संगिता वाघुले**

श्रीमती संगीता वाघुले :मिसरवाडी आरतीनगर भागात नाल्याची पाहणी कधी करणार आहे सुचना देण्यात याव्यात.

मा.महापौर :तातडीने कार्यवाही करावी.

**प्रश्न क्रमांक ४७९ :स.श्रीमती संगिता वाघुले**

श्रीमती संगीता वाघुले :माहिती का दिली नाही.

नगररचना अधिकारी :सीडी दिली आहे.

**प्रश्न क्रमांक ४५५ :स.श्री खान जहॉगीर मुलानी**

प्रशासकीय अधिकारी :भुमीगत गटार योजनेअंतर्गत नाल्यावर असलेले बांधकाम काढण्यासाठी सुचना केली होती. त्यानुसार नुरकॉलनी, चेतनानगर, शिवशंकर कॉलनी, गादीया विहार नाल्यावरील अतिक्रमण काढले आहे. जेथे गटार योजना अंतर्गत करण्याचे काम करावयाचे आहे व तेथे अतिक्रमण असेल तर ते काढले जाईल.

श्री.जहॉगीर खान :कटकटगेट, आझाद चौक पर्यतचे अतिक्रमण हटविले आहे. नाल्यावरील अतिक्रम हटविले जात नाही. त्यांचेकडून टॅक्स वसुल करणार की, ते हटविणार आहे.

प्रशासकीय अधिकारी :नगर रचना विभागाकडून मार्कींग करून घेण्यात येईल. त्यानंतर कार्यवाही करावी लागेल.

नगर रचनाकार :शहरातील कुठल्याही नाल्याची हद्द निश्चित नाही. त्या निश्चित करावयाच्या असतील तर सिटी सर्वे करून मोजणी करून बॉन्ड्री फिक्स करावी लागेल. मागे चार पाच नाल्याची हद्द निश्चित करण्यासाठी सिटी सर्वेला पाठविले होते. नकाशे मिळाले नाही. तुर्त नाला प्रवाहामध्ये अतिक्रमण असेल तर कार्यवाही करता येईल.

श्री.फेरोज खान :शहाबाजार झोपडपट्टी नाल्यावर अतिक्रमण झाले. वारंवार मागणी करतो कार्यवाही होत नाही. एक वर्षापासून मार्कींग होत नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :सन-२००६ मध्ये नाल्याची मोजणी केली होती. ३ कोटी खर्च केले ते मोजणी नकाशा कुठे आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :खामनदीमध्ये १०० मीटरपर्यत अतिक्रमण विभागाने मार्कींग केले. त्यानुसार अतिक्रमण काढणार आहे का? सर्वेचे काम २००६ मध्ये दिले होते. त्या एजन्सीने कोणते काम केले. त्या एजन्सीने मार्कींग करून पोल टाकून हद्द करून देणे पर्यत काम होते.

नगर रचना अधिकारी :नगर रचना विभागाच्या मार्फत खाजगी एजन्सीला मोजणीसाठी ३ कोटी दिले. नाही. असे काम प्रस्तावित केले नाही. ४-५ नाले मोजणीसाठी २० लक्ष भरले होते.

श्री.जहागीर खान :एसटी कॉलनी, कटकट गेट नाल्याची मोजणीसाठी पैसे भरले होते. अद्याप पर्यत मोजणी का केली नाही?

प्र.मा.आयुक्त :नाल्याची रूंदी किती आहे? सीटी सर्वे ऑफिस करून मोजणी करुन घेणे आवश्यक राहिल. ३-४ नाल्याची मोजणी करण्यासाठी पैसे भरणा केलेले आहे. त्या नाल्याची ताबडतोब मोजणी कशी करुन घेता येईल? प्रयत्न केले जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :पेपरला बातमी की, खामनदीचे अतिक्रमण तोडणार आहे. १०० फुटापर्यत तोडणार की, जी मार्कींग केले तिथपर्यंत तोडणार? योग्य निर्णय होऊ द्यावा. ३०० फुटापर्यत मार्कींग केली.

श्री.राजेंद्र जंजाळ :नाल्याचे सेंटर कुठे होते? नाला कोठून कुठपर्यंत रूंद आहे? नेमके मनपास माहित आहेत का? कसे तोडणार आहे?

नगररचना अधिकारी :खामनदीचा वार्ड-अ अभियंता यांचेकडून सर्वे केलेला आहे. नकाशे उपलब्ध आहे. त्यानुसार मार्कींग केली आहे.

श्री.फेरोज खान :जेथे गरीब लोकाची वस्ती आहे. तेथील नकाशे उपलब्ध असतात. कार्यवाहीस तयार असतात. कटकटगेट, शहाबाजार झोपडपट्टी लगतच्या नाल्यावरील अतिक्रमण काढले जात नाही.

श्री.जफर शेख :वार्ड-६० इंदिरानगर, बायजीपुरा भागात लोकांनी नाल्यावर घरे बांधली. कार्यवाही होत नाही. ३ वर्षापासून नाल्याची मोजणी होत नाही.

प्र.मा.आयुक्त :संबंधीत अधिकारी यांना उद्याच प्रत्यक्ष जागेवर घेऊन पाहणी केली जाईल कार्यवाही होईल.

मा.महापौर :खामनदीचा पहिल्यांदा १०० फुटाचा प्रवाह मोकळा करावा.

**विषय क्रमांक ४१९:-** **(उपआयुक्त, आस्थापना)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नगर विकास विभागाचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ मध्ये उप-विभाग असाधारण क्र.२ आदेश व अधिसूचना दि.१८.०१.२०१६ नुसार सातारा-देवळाई नगर परिषद जि.औरंगाबादच्या हद्दीतील क्षेत्राचा औरंगाबाद महानगरपालिकेच्या बहुल नागरी क्षेत्रामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने दिनांक २२.०१.२०१६ रोजी सदर कार्यालयाचे/क्षेत्राचे हस्तांतरण औरंगाबाद महानगरपालिकेकडे करण्यात आलेले आहे.

वॉर्ड अधिकारी, सातारा-देवळाई यांनी पाठविलेल्या अहवालानुसार सातारा व देवळाई ग्रामपंचायत पासुन कार्यरत विविध संवर्गातील एकूण ४३ कर्मचाऱ्यांना (सोबतच्या विवरणपत्रानुसार)

सध्या कार्यरत असलेल्या पदावर व घेत असलेल्या वेतनावर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्याबाबत प्रकरण सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

श्री.नंदकुमार घोडेले :हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. परंतु या पुर्वीचे मनपा आस्थापनेवरील वर्ग-४ चे १४१ व वर्ग -३ चे ६० कर्मचारी आहे त्यांना कायमस्वरूपी सेवेत घेणेसाठी प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे पाठविला होता. पुढे काय कार्यवाही केली माहिती द्यावी. या कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठीचा प्रस्ताव सुध्दा तयार करून प्रकरण शासनाकडे पाठवावे.

श्री.राजगौरव वानखेडे :या कर्मचाऱ्याची शैक्षणिक पात्रता त्या पदासाठी योग्य आहे का? याची माहिती घेऊन कार्यवाही करावी.

मा.महापौर :कोणते कर्मचारी कुठल्या पदावर आहे. त्याची त्या पदासाठी लागणारी पात्रता योग्य आहे का? हे पाहणे गरजेचे आहे. हा विषय पुढील सभेत प्रशासनाने सविस्तर माहितीसह ठेवावा. तोपर्यत स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावात सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कोणते कर्मचारी कुठल्या पदावर आहे. त्याची त्या पदासाठी लागणारी पात्रता योग्य आहे किंवा कसे याबाबत व इतर सविस्तर माहितीसह प्रस्ताव पुढील सर्वसाधारण सभेत ठेवण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ४२०:-**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती मोठ्या उत्साहाने सर्व देशांसह भारतात साजरी करण्यात आलेली आहे. भारताच्या या सुपूत्राच्या १२५ व्या जयंती निमीत्ताने देशभरात विविध कार्यक्रमाचे तसेच विविध विकास कामाचे आयोजन करण्यात आलेले होते. तसेच सामाजिक न्याय विभागामार्फत विविध कार्यक्रमासह देशभरात विकास कामे करण्यात येत आहेत.

औरंगाबाद शहर हे डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या पद्स्पर्शाने पावन झालेले शहर असून या शहरात डॉ.बाबासाहेबांनी पिपल्स् एज्युकेशन सोसायटीचे मिलींद महाविद्यालय तसेच डॉ.आंबेडकर महाविद्यालयाची स्थापना केलेली असल्याने या शहराला बाबासाहेबांविषयी विशेष आदर आहे. डॉ.बाबासाहेबांच्या १२५ व्या जयंती निमित्त या ऐतिहासीक शहरातील दलित व मागास भागाचा विकास व्हावा या करीता सामजिक न्याय विभागामार्फत शहरातील दलित वसाहती मधील रस्त्यांसाठी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा या साठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात यावे.

या करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

**अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड,श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ,श्री.गजानन राधाकिसन बारवाल, श्री.रेणुकादास (राजू) वैद्य, श्री.दिलीप गंगाधर थोरात,श्री.खान जहांगीर अब्बास मुलानी,

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त ऐतिहासीक शहरातील दलित व मागास भागाचा विकास व्हावा या करीता सामजिक न्याय विभागामार्फत शहरातील दलित वसाहती मधील रस्त्यांसाठी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन स्तरावर कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३५ नारेगाव अंतर्गत आनंद गाडे नगर असून या ठिकाणी माजी मंत्री श्री.राजेंद्रजी दर्डा यांच्या निधीमधून सामाजिक सभागृह बांधण्यात आलेले आहे. या सभागृहास “डॉ.भिमराव रामजी आंबेडकर सभागृह” असे नाव देण्याची या भागातील नागरीकांनी मागणी केलेली आहे.

करीता आनंद गाडे नगर येथील माजी मंत्री श्री.राजेंद्रजी दर्डा यांच्या निधीमधून बांधण्यात आलेल्या सामाजिक सभागृहास “डॉ.भिमराव रामजी आंबेडकर सभागृह” असे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री. मलके गोकूलसिंग संपतसिंग **अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३५ नारेगाव अंतर्गत आनंद गाडे नगर येथील माजी मंत्री श्री.राजेंद्रजी दर्डा यांच्या निधीमधून बांधण्यात आलेल्या सामाजिक सभागृहास नियमाप्रमाणे “डॉ.भिमराव रामजी आंबेडकर सभागृह ” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा मनपा हद्दीतील औरंगाबाद महामार्गालगत गट नं.७३७ क्षेत्र १ एकर ही सरकारी गायरान जमिन असून ह्या जमिनीच्या बाजुला जिल्हा सामान्य रुग्णालय काही काळाने कार्यान्वयीत होणार आहे तसेच आजुबाजूच्या खेड्यातील लोकांचे मध्यवर्ती खरेदी विक्रीचे चिकलठाणा हे गाव मुख्य स्थान बनले आहे. सदरील जमिन मनपाने हस्तांतरीत केल्यास या जागेचा मनपास व्यापारी संकुल, बस थांबा पाण्याची टाकी, मनपा वॉर्ड कार्यालय, मंगल कार्यालय तसेच विविध कामांसाठी उपयोग करता येईल.

करीता, गट नं.७३७ मधील सरकारी जमिन मनपाकडे हस्तांतरीत करण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवून हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा या करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती वैशाली कारभारी जाधव **अनुमोदक:-**श्री.सोहेल शकील शेख

मा.महापौर :मंजूर, शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा मनपा हद्दीतील औरंगाबाद महामार्गालगत गट नं.७३७ क्षेत्र १ एकर ही सरकारी गायरान जमिन प्रस्तावात नमुद विविध कामांसाठी उपयोगाकरीता मनपाने

हस्तांतरीत करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवून कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१५ मिटमिटा परीसरामध्ये देवगिरी व्हॅली वसाहतीच्या बाजुला जगातील पहिले विश्वयोगी स्वामी मच्छींद्रनाथाचे मंदीर आहे. हे मंदीर मुंबई नाशिक महामार्गालगत आहे. तसेच जग प्रसिध्द वेरुळलेणी, घृष्णेश्वर मंदीर, दौलताबाद किल्ला, भद्रा मारोती मंदीर, म्हैसमाळ हे पर्यटन स्थळे ही याच मार्गालगत आहे. करीता देवगिरी व्हॅली समोर भव्य प्रवेश द्वार उभारून सदरील प्रवेश द्वारास प.पु.सद्‌गुरू योगेश्वरानंद “डॉ.मंगलनाथ महाराज प्रवेशद्वार” असे नाव देण्यात यावे. म्हणजे पर्यटाकांना जगातील पहिले विश्वयोगी स्वामी मच्छींद्रनाथाचे मंदिर माहिती होईल. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रावसाहेब राधाकिसन आमले **अनुमोदक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१५ मिटमिटा परीसरामध्ये देवगिरी व्हॅली समोर भव्य प्रवेश द्वार उभारून सदरील प्रवेश द्वारास प.पु.सद्‌गुरू योगेश्वरानंद “डॉ.मंगलनाथ महाराज प्रवेशद्वार” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२४ शहाबाजार येथे शासन मान्य दलित वस्ती क्र.१.अशोकनगर, २.भोईवाडा, ३.त्रिवेणीनगर या भागात दलित वस्तीचा दर्जा उच्च करण्यास महाराष्ट्र शासनाने दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत दिलेले विविध ठिकाणी विकासाचे कामे करण्याकरीता रुपये ५० लक्ष रुपये निधी शासनाकडून मिळण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी

**अनुमोदक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन, श्री.सय्यद मतीन रशीद.

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२४ शहाबाजार येथे १.अशोकनगर, २.भोईवाडा, ३.त्रिवेणीनगर या भागात विविध ठिकाणी विकासाचे कामे करण्याकरीता दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत रक्कम रुपये ५० लक्ष रुपये निधी शासनाकडून मिळण्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पुर्वीचे वॉर्ड क्र.४१ या वॉर्डामध्ये काचीवाडा शांती हॉटेल ते सिराज भाई यांच्या घरापर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रेटचे काम करण्याची निवीदा काढण्यात आली होती.

सदर ठिकाणी तत्कालीन आमदार मा.प्रदिपजी जैस्वाल यांच्या निधीतून कॉंक्रेटींगचे काम बांधकाम विभागामार्फत करण्यात आले. या करीता म.न.पा.निधीतून मंजुर कॉंक्रेटिंगचे काम स्थळ बदली करण्याची मागणी वॉर्ड क्र.२४ चे सदस्यांनी केली. तत्कालीन मा.आयुक्त, महाजन साहेब यांनी चौकशी करुन स्थळ पाहणी करून स्थळ बदली करून काम करण्याची मंजुरी दिलेली आहे. अद्याप स्थळ बदलीचे ठिकाणी काम करण्यात आलेले नाही. या कॉंक्रटींगचे कामामध्ये दिरंगाई करणारे अभियंतांना

समज देऊन स्थळ बदल ठिकाणी फेर निवीदा काढून काली मस्जीद शहाबाजार ते म.न.पा.उर्दु शाळेपर्यंत व इतर ठिकाणी कॉंक्रेटींगचे रस्ते तयार करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी

**अनुमोदक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन, श्री.सय्यद मतीन रशीद.

श्री.राजेंद्र जंजाळ :या कामासाठी आमदार निधीतून हे काम करणार आहे निधी उपलब्ध आहे का? असेल तर काम करावे.

मा.महापौर : शहर अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुर्वीचे वॉर्ड क्र.४१ या वॉर्डामध्ये काचीवाडा शांती हॉटेल ते सिराज भाई यांच्या घरापर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रेटचे काम आमदार निधीतून करण्यात आले असुन या करीता म.न.पा.निधीतून मंजुर कॉंक्रेटिंगचे काम स्थळ बदली करुन काम करण्याची मंजुरी दिल्यानुसार काम करण्यात आलेले नसून स्थळ बदल ठिकाणी फेर निवीदा काढून काली मस्जीद शहाबाजार ते म.न.पा.उर्दु शाळेपर्यंत व इतर ठिकाणी कॉंक्रेटींगचे रस्ते तयार करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर) येथील महानगरपालिकेची प्राथमिक शाळा ही फक्त इयत्ता ७ वी पर्यंतच असल्याकारणाने व ८ वी ,९ वी व १० वीचे वर्ग नसल्यामुळे ७ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना टि.सी. दिली तर शाळेचा पट खुप कमी होईल. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेमध्ये इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी हे तिन्ही वर्ग सूरु करण्यात यावेत. जेणेकरून वॉर्डातील नागरीकांच्या पाल्यांना व विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सुलभ होईल.

या करीता वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर) भावसिंगपुरा येथील महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेमध्ये ८ वी, ९ वी व १० वी चे वर्ग सुरू करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती आशाताई विजय निकाळजे **अनुमोदक:-**श्रीमती संगीता सुभाष वाघुले.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर) भावसिंगपुरा येथील महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेमध्ये ८ वी, ९ वी व १० वी चे वर्ग सुरू करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, फाजलपुरा येथील शांती हॉटेल ते काचीवाडा तसेच महानगरपालिका ऊर्दु शाळा शहाबजार ते चंपाचौक ह्या १०० फुटाच्या रस्त्या पर्यंत रुंदीकरण करण्या करीता डेव्हलेप्मेंट प्लॅन मध्ये आहे.

सदर रस्ता रुंदीकरण संदर्भात सर्वसाधारण सभेत प्रश्न विचारला होता. संबंधीत अधिकाऱ्यांनी एका महिन्याचे आत रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या मिळकतींवर मार्किंग करण्याचे आश्वासन दिले होते. दिलेल्या ठिकाणी आजपर्यंत कोणतीही मार्किंग करण्यात आली नाही.

तसेच, चेलीपुरा पोलीस चौकी ते चंपाचौक पर्यंतच्या रस्त्यांवरील मिळकतीवर मार्किंग करुन डेव्हलेप्मेंट प्लॅन प्रमाणे रस्ता मोकळा करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण या दोन्ही ठिकाणी रहदारीला व समस्त नागरीकांना वाहतुकीचा फार मानसीक त्रास होत आहे.

करीता, सर्वसामान्य लोकांचा, रहदारीचा व वाहतुकीचा विचार करुन मानसीक त्रास दुर करण्यासाठी वर नमुद दोन्ही रस्त्यांचे रुंदीकरण करुन मिळकत धारकांना टि.डी.आर.नोटीस बजावण्यासाठी व मार्किंग करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी

**अनुमोदक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन,श्री.सय्यद मतीन रशीद.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फाजलपुरा येथील शांती हॉटेल ते काचीवाडा तसेच मनपा ऊर्दु शाळा शहाबजार ते चंपाचौक तसेच, चेलीपुरा पोलीस चौकी ते चंपाचौक पर्यंतच्या रस्त्यांचे डेव्हलेप्मेंट प्लॅन प्रमाणे मार्किंग करुन रस्ता रुंदीकरण करुन मिळकत धारकांना टि.डी.आर.नोटीस बजावण्यास व आवश्यक ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**पुरवणी विषय**

**विषय क्रमांक ४२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०६ मध्ये नक्षत्रवाडी येथे महानगरपालिकेचा व्यायामशाळेचा हॉल असून तो सध्या रिकामा असल्याने त्याचा काहीही उपयोग होत नसून सदरील हॉल भकास अवस्थेत असल्याने त्याची दारे खिडक्या तुटलेल्या आहे. संपूर्ण वायरींग तुटलेली आहे, फरशी फुटलेली आहे, त्यामुळे रिकामे हॉलचे नुकसान होत आहे.

वॉर्डातील रहिवासी श्री.राहुल साळवे यांचे आर्या फिटनेस हेल्थ कल्ब कांचनवाडी या नावाने नोंदणीकृत क्लब असल्याने त्यांना सदरील रिकामा हॉल व्यायामशाळा चालविण्यास दिल्यास ते हॉलचे दुरुस्तीसह देखभाल सुध्दा करतील व महानगरपालिकेस या रिकाम्या हॉल पासुन उत्पन्न सुध्दा मिळेल. सदरील व्यायामशाळा सुरु केल्यास गांवकऱ्यांना सुध्दा कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

तरी सदरील बंद रिकामा हॉल आर्या फिटनेस हेल्थ क्लब, कांचनवाडी यांना नियमानुसार भाडे तत्त्वावर देण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती विमल जनार्धन कांबळे

**अनुमोदक:-** श्री.नितीन रमन चित्ते, श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव,

**चर्चा:-**

श्री.राजेंद्र जंजाळ :असे ठराव ठेवतांना ते प्रशासनाकडून आले पाहिजे. हा प्रशासनाचा विषय आहे. मालमत्ताच्या बाबतीत मा.उच्च न्यायालयाचे पण निर्देश आहे की, काही मालमत्ता हॉल, सामाजिक सभागृह असतील ते भाड्याने देतांना रेडीरेकनर प्रमाणे भाडे घेतले पाहिजे.

मा.महापौर :स्थायी समिती मध्ये व सर्वसाधारण सभेमध्ये मनपाचे हॉल/इमारती भाडयाने देणे बाबत जो निर्णय झाला त्या प्रमाणे प्रशासनाने सदरील विषयी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. प्रशासनाने एकत्रित असे विषय आणावेत. ज्या ज्या भागातील नागरीकांची मागणी आहे. त्या वसाहतीमधील नागरीकांची संमती घेऊन हॉल देणे बाबत नियमानुसार कार्यवाही करावी. सभेच्या निर्णयाच्या अधिन राहून योग्य कार्यवाही करावी.

**ठराव:-**

वॉर्ड क्र.१०६ नक्षत्रवाडी येथे महानगरपालिकेचा व्यायामशाळेचा बंद रिकामा हॉल आर्या फिटनेस हेल्थ क्लब, कांचनवाडी यांना नियमानुसार भाडेतत्वावर देणे बाबत स्थायी समितीमध्ये व सर्वसाधारण

सभेमध्ये मनपाचे हॉल भाड्याने देणे संदर्भाने झालेल्या निर्णयाच्या अधिन राहून नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

मा.महापौर :दुबईला जाण्याचा प्रस्ताव आहे आपआपल्या खर्चाने जावे लागणार आहे. विषय मंजूर, जेटींग मशीन खरेदीचा विषय मंजूर, नगररचना कार्यालयास शासनाने ठरवून दिलेले भाडे नुसार नियमानुसार जागा द्यायची. विषय मंजूर रू.१५० कोटीचे रस्ते करायचे आहे. शासनाकडे प्रस्ताव देऊन निधीची मागणी करणार आहोत. महापालिकेचाही निधी असणार आहे. विषय मंजूर शहरात महापालिकेचे रिकामे हॉल, काही गाळे पडून आहेत, ते देणेसाठी वारंवार मागणी होते, टेंडर काढतो, रिकॉल केले जाते. ज्या ठिकाणी दुकाने पडून आहेत ते ताबडतोब देणेसाठी कार्यवाही करावी. गारखेडा येथील पाच दुकाने गेल्या नाहीत. टेंडर केले. निविदा आल्या नाहीत. या सभेची मंजूरी म्हणून तात्काळ कार्यवाही करावी. कैलासनगर रस्त्याचा विषय आहे. या संदर्भात कुणी न्यायालयात गेले काय? ते बघावे. त्यानुसार कार्यवाही करावी तेथे जाऊन रितसर प्रशासनाने पाहणी करावी. डी पी प्लॅनच्या संदर्भात कमेटीवर दोन सदस्यांची निवड करायची आहे. तो प्रस्ताव मंजूर.

**विषय क्रमांक ४३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची लोकसंख्या आजमितीस १५ लक्ष एवढी झाली असुन, महागरपालिका प्राधिकरणाचे क्षेत्रफळ सातारा देवळाई क्षेत्रासह जवळपास १५० चौ.कि.मी. एवढे झाले आहे. शहरामध्ये वाहनांची संख्या ०१ लक्षच्या वर गेली आहे. शहरालगत केंद्रशासनाचे मंजुरीनुसार डी.एम.आय.सी. क्षेत्र घोषीत झाले आहे. शहरामध्ये देशी/विदेशी पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते. या सर्व बाबी विचारात घेता शहरामध्ये प्राथमिक सोयीसुविधा या आजमितीस अपुऱ्या पडत असल्याचे दिसुन येत आहे. यामध्ये नागरी समस्या उदा. घनकचरा व्यवस्थापन, रस्ते बांधणी, पाणी पुरवठा, मलनिःसारण, आरोग्य, शैक्षणिक बाबीं, वाहतुक व्यवस्था, अग्निशमन इत्यादी प्रमुख सोयी सुविधांचा समावेश आहे.

उक्त बाबी विचारात घेता इतर प्रगत देशांप्रमाणे औरंगाबाद शहरामध्ये पुरविण्यात येणाऱ्या या सोयी-सुविधांचे आधुनिकीकरण/सक्षमीकरण करणे गरजेचे असून, यासाठी इतर प्रगत देशांमधील विकसित झालेल्या शहरांचा या मुद्यांबाबत अभ्यास करणे गरजेचे वाटते. यासर्व मुद्यांकरीता इतर शहरांचा विशेषतः प्रगत देशातील शहरांचा अभ्यास दौरा करणे प्रस्तावीत करण्यात येते. या बाबत अभ्यास दौऱ्यासाठी जाणे करीता नियोजन करण्यात यावे असे पत्र मा.उप महापौर यांनी दिनांक ०२.०४.२०१६ रोजी दिले आहे. या दौऱ्यामध्ये Strom water Drain System, STP Projects, Transportation System, Solid waste management System व नागरीकांची सुविधांकरीता आवश्यक इतर मुद्यांबाबत अभ्यास करणे, निरीक्षणे नोंदविणे व अनुषंगिक इतर आधुनिक बाबींची अद्ययावत माहिती घेणे शक्य होणार आहे.

करीता याबाबत विचार करता दुबई शहराचा स.पदाधिकारी, स.नगरसेवक/नगरसेविका आणि निवडक अधिकारी यांचा संयुक्त दौरा करण्याचे नियोजन करणे आहे. यामध्ये महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता दौऱ्याचा संपुर्ण खर्च, दौऱ्यामध्ये जाणाऱ्या प्रत्येक सदस्याने / अधिकाऱ्याने स्वतः करावा. तसेच दौऱ्यास राज्य शासनाच्या प्रचलित पध्दतीनुसार मान्यता आणि दुबई शासनाच्या परवानगीस आधीन राहुन या दौऱ्यांचे नियोजन करण्यात येईल. विदेश दौऱ्यास शासनाची तसेच

संबंधीत देशाची मान्यता झाल्यानंतर दौऱ्याबाबतच्या तारखा, इतर अनुषंगिक बाबी, पत्रव्यवहार अंतिम करण्यात येईल.

तरी उक्त प्रमाणे दुबई या प्रगत शहराचा वरील संयुक्त अभ्यास दौरा करणेस मान्यता होणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजुर. संबंधीतांनी स्वखर्चाने हा दौरा करावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराची लोकसंख्या, वाढलेले क्षेत्र, वाहनांची संख्या विचारात घेता शहरामध्ये प्राथमिक सोयीसुविधा यामध्ये नागरी समस्या उदा. घनकचरा व्यवस्थापन, रस्ते बांधणी, पाणी पुरवठा, मलनि:सारण, आरोग्य, शैक्षणिक बाबीं, वाहतुक व्यवस्था, अग्निशमन इत्यादी प्रमुख सोयी सुविधा अपुऱ्या पडत असल्याने इतर प्रगत देशांप्रमाणे औरंगाबाद शहरामध्ये पुरविण्यात येणाऱ्या या सोयी-सुविधांचे आधुनिकीकरण/सक्षमीकरण करणे गरजेचे असल्याने व तेथील अनुषंगिक इतर आधुनिक बाबींची अद्यावत माहिती घेणेसाठी स.पदाधिकारी, स.नगरसेवक/नगरसेविका आणि निवडक अधिकारी यांचा दुबई दौरा करण्याकरीता व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता दौऱ्याचा संपुर्ण खर्च, दौऱ्यामध्ये जाणाऱ्या प्रत्येक सदस्याने / अधिकाऱ्याने स्वत: करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच दौऱ्यास राज्य शासनाच्या प्रचलित पध्दतीनुसार मान्यता आणि दुबई शासनाच्या परवानगीस आधीन राहुन या दौऱ्यांचे नियोजन करण्यात येईल. विदेश दौऱ्यास शासनाची तसेच संबंधीत देशाची मान्यता झाल्यानंतर दौऱ्याबाबतच्या तारखा, इतर अनुषंगिक बाबी, पत्रव्यवहार अंतिम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४३१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका शहरहद्दीतील जलनि:सारण वाहिन्यांचे चोकअप काढण्याच्या कामासाठी सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे स्वत:चे साधारणपणे ९ ते ११ टन (GVW) क्षमतेच्या चेसीसवर बसविलेल्या ४००० लिटर ते ६००० लिटर क्षमतेच्या ०६ नग जेटींग मशिन कार्यरत आहेत. सदरील जेटींग मशिन प्रत्येक वॉर्ड कार्यालयास एक या प्रमाणे वाटप करण्यात आलेल्या असुन वॉर्ड कार्यालयाच्या मार्फत ड्रेनेज लाईन चोकअप काढण्याची कामे करण्यात येतात. तथापी, सदर जेटींग मशिन स्लम/गुंठेवारी वसाहतीमधील अरुंद रस्त्यावर पोहचु शकत नसल्यामुळे ड्रेनेज चोकअप काढण्याच्या कामात अडचण निर्माण होते. तसेच सातारा-देवळाई परिसराचा औरंगाबाद महानगरपालिकेत समावेश झालेला असल्यामुळे सध्याच्या सहा जेटींग मशिनद्वारे नियमितपणे कामे करणे शक्य होत नाही.

अशा स्लम व गुंठेवारी वसाहतीत ड्रेनेज चोकअपचे कामे करण्यासाठी लहान आकाराचे व कमी क्षमतेची जेटींग मशिन प्रत्येक वॉर्ड कार्यालया करीता एक या प्रमाणे ०६ जेटींग मशिन खरेदी करणे गरजेचे आहे. सर्वसाधारणपणे ४ ते ५ टन (GVW) चेसीससह वाहनावर २००० लिटर क्षमतेची जेटींग मशिन उभारणी करणे करीता खालील प्रमाणे खर्च येतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ४ ते ५ टन (GVW) (एस.एफ.सी./एलपीटी) चेसीस खरेदी | : | रु.८,८१,१०१/- प्रतिनग |
| २) | २००० लिटर क्षमतेची जेटींग मशिन सर्व साहित्यासह चेसीसवर उभारणी करणे. | : | रु.१५,८०,०९५/-प्रतिनग |
| | एकुण | : | रु.२४,६४,४९६/-प्रतिनग |

एकुण ०६ नग जेटींग मशिन करीता येणारा खर्च रुपये (२४,६१,१६६ X ०६) = १,४७,६७,१७६/-

उपरोक्त प्रमाणे एकुण ०६ नग जेटींग मशिन खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये १,४७,६७,१७६/- खर्च अपेक्षीत आहे. जलनि:सारण वाहिन्यांचे चोकअप काढण्याच्या कामासाठी ०६ नग जेटींग मशिनची खरेदी सन २०१६-१७ चे अर्थसंकल्प भांडवली खर्च अंतर्गत "नवीन वाहने खरेदी" या लेखाशिर्षातुन उपलब्ध तरतुदीमधून करता येईल. करीता ०६ नग जेटींग मशिनची खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर : ऐनवेळीचा विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्लम व गुंठेवारी वसाहतीत ड्रेनेज चोकअपची कामे करण्यासाठी लहान आकाराच्या व कमी क्षमतेच्या जेटींग मशिन प्रत्येक वॉर्ड कार्यालया करीता एक या प्रमाणे ०६ नग जेटींग मशिन सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्प भांडवली खर्चाअंतर्गत "नवीन वाहने खरेदी" या लेखाशिर्षातुन उपलब्ध तरतुदीमधून नियमाप्रमाणे खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रुपये १,४७,६७,१७६/- च्या खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३२:-** **(मालमत्ता विभाग)**

उप आयुक्त (मालमत्ता) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, जालना रोड औरंगाबाद येथील न.भु.क्र.१२८७७/अ/१ सिटी प्राईड इमारत मधील समावेशक आरक्षण विकासांतर्गत विकासित महानगरपालिकेचा हॉल बांधीव क्षेत्र ३७५.०० चौ.मी. व वाहनतळ क्षेत्र ३७५.०० चौ.मी. महाराष्ट्र शासनाचे सहाय्यक संचालक, नगर रचना औरंगाबाद या शासकीय कार्यालयासाठी भाडेतत्वावर देणेबाबत मा.आयुक्तांची मान्यता झालेली आहे.

त्यानुषंगाने सदरील हॉल साठी सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचेकडे इमारतीचे वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडे निश्चिती करून महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहून तीन वर्षाच्या कालावधीसाठी शासकीय कार्यालयास हॉल भाडेतत्वावर देण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड औरंगाबाद येथील न.भु.क्र.१२८७७/अ/१ सिटी प्राईड इमारत मधील समावेशक आरक्षण विकासांतर्गत विकासित महानगरपालिकेचा हॉल बांधीव क्षेत्र ३७५.०० चौ.मी. व वाहनतळ क्षेत्र ३७५.०० चौ.मी. महाराष्ट्र शासनाचे सहाय्यक संचालक, नगर रचना औरंगाबद या शासकीय कार्यालयासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचेकडे इमारतीचे वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडे निश्चिती करून महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहून तीन वर्षाच्या कालावधीसाठी शासकीय कार्यालयास हॉल भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासीक शहर असून मराठवाडयाची राजधानी आहे. या शहरास पर्यटन, शैक्षणिक, औद्योगिक दृष्टीने जागतिक पातळीवर महत्व आहे. या कारणाने देशी/विदेशी पर्यटक, विद्यार्थी, संशोधक, उद्योजक दररोज शहरास भेटी देतात. तसेच औरंगाबाद शहराच्या सर्व बाजूने म्हणजे शेंद्रा, वाळुज, पैठण इत्यादी भागातील वाढते औद्योगिकीकरण तसेच दिल्ली मुंबई औद्योगिक कॉरीडोरमुळे शहराच्या लोकसंख्येत वाढ होत आहे. सन २०११ च्या

जनगणनेनूसार शहरातील लोकसंख्या सुमारे १२.०० लक्ष असून आजमितीस जवळपास १५.०० लक्ष इतकी झालेली आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता शहरात वास्तव्यास असणाऱ्या तसेच शहरात येणाऱ्या सर्व नागरिकांना/पर्यटकांना शहरात चांगल्या प्रतीचे रस्ते व इतर पायाभूत सुविधा देणे महानगरपालिकेचे काम आहे. शहरातील मुख्य रस्त्यांची सद्यस्थिती पाहता अनेक रस्ते वाहतुकीस असुलभ (Non-Motorable) झालेले आहेत तर काही रस्त्यांच्या पृष्ठभागाची झीज-तुट (Wear & Tear) झालेली आहे. सदर रस्त्यांची व्हाईट टॉपींग काँक्रीट अथवा डांबरीकरणाद्वारे पुर्नःबांधणी (IRC व MORT&H यांचे मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करुन) करणे आवश्यक आहे. या नुसार शहरातील बहुतांश मुख्य रस्त्यांची पुर्नःबांधणी करणेसाठी अंदाजे किमान रक्कम रुपये १५० ते २०० कोटी रक्कमेची आवश्यकता आहे. तथापि महानगरपालिकेची सद्य आर्थिक स्थिती पाहता या रस्ता सुधारण्याचे कामाचे प्रकल्पासाठी आर्थिक तरतुदी करीता महाराष्ट्र शासनाकडून अर्थसहाय्य प्राप्त होणे बाबत विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने मा.महापौर यांनी सुचित केल्या प्रमाणे शहरातील (Non-Motorable) मुख्य रस्त्यांचे प्राथमिक सर्व्हेक्षण करुन त्यानूसार प्रथम प्राधान्याने करावयाच्या सोबतच्या यादीतील रस्त्यांची पुर्नःबांधणीच्या कामाचे (रक्कम रुपये १५० कोटीच्या मर्यादेत) अंदाजपत्रकाचा समावेश DPR मध्ये करण्यात येईल. सदर कामाची व्याप्ती पाहता व प्रकल्प अहवाल तांत्रिकदृष्टया योग्य होणे करीता या कामातील तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करणे आवश्यक ठरते. सदर विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) हा संभाव्य रक्कम रुपये १५० कोटी रक्कमेचा तयार करणे करीता तसेच या संदर्भाने निविदा पूर्व कामे करणे करीता PMC यांना या प्रकल्प रक्कमेच्या काही प्रमाणात म्हणजेच प्राप्त निविदा दर निश्चिती नूसार महानगरपालिकेस रक्कम अदा करावी लागणार आहे. या साठी किमान रक्कम रुपये एक कोटीची तरतूद करण्यात यावी.

करीता वर नमुद प्रमाणे अ) औरंगाबाद शहरातील वाहतुकीस असुलभ (Non-Motorable) मुख्य रस्त्यांची व्हाईट टॉपींग काँक्रीट अथवा डांबरीकरणाद्वारे कामे करणेच्या अंदाजे रक्कम रुपये १५०.०० कोटी अंदाजपत्रकासाठी मान्यता व्हावी. सोबतच्या यादीनूसार रस्त्यासाठी ढोबळ मानाने रक्कम रुपये १५०.०० कोटी अंदाजीत खर्च घेण्यात आला आहे. प्रत्यक्ष सर्व्हेक्षण केल्यानंतर स्थळावरील वस्तुस्थिती आधारे सविस्तर अंदाजपत्रके तयार करतांना ही रक्कम कमी जास्त होऊ शकते.

ब) अंदाजीत रक्कम रुपये १५०.०० कोटी रक्कमेच्या रस्त्याचे सविस्तर सर्वेक्षण करुन विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व उपलबध होणाऱ्या निधीनूसार या रस्त्यांच्या कामाकरीता निविदेची निविदापूर्व कामे करणे इत्यादी करीता, अशा प्रकारच्या कामे करणाऱ्या अनुभवी व तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करणे करीता व त्यासाठी निविदा मागविणे (Expression of Interest) या साठी मान्यता व्हावी.

करीता उपरोक्त नमुद केलेल्या अ व ब चा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध मुख्य व अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे

| अ क्र | रस्त्याचे नांव | अंदाजे खर्च (आकडे लाखात) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | पीरबाजार ते शिवाजीनगर (व्हाया एकता चौक) | १०५०.०० | व्हाईट टॉपींग व डांबरीकरण |
| २ | सायली हॉटेल ते सिंधी कॉलनी (पुला मार्गे) रस्त्याचे (सभोतालच्या रस्त्यासह) काम करणे | २००.०० | व्हाईट टॉपींग व डांबरीकरण |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | नाथनगर, शिवशंकर कॉलनी येथे नाल्यावर पुल बांधणे | १२५.०० | |
| ४ | शिवशंकर कॉलनी, शिव हनुमान मंदिर ते नाला (बाजुबाजुच्या रस्त्यासह) पर्यंत रस्त्याचे काम करणे | १६५.०० | व्हाईट टॉपींग |
| ५ | मोंढा नाका, सिंधी कॉलनी ते बालाजी मंगल कार्यालय रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | ८०.०० | व्हाईट टॉपींग |
| ६ | चौसरनगर ते महादेव मंदिर दशमेशनगर पर्यंतचा १५.०० मीटर रुंद रस्ता | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| ७ | जळगांव रोड ते ए.पी.एम.सी. हद्दीपर्यंत १२० फुट रुंदीचा रस्ता | ३००.०० | डांबरीकरण |
| ८ | महालक्ष्मी चौक ते सोहम मोर्टस (जालना रोड) | २५०.०० | व्हाईट टॉपींग |
| ९ | सेव्हनहिल ते टि.व्ही. सेंटर रस्ता (व्हाया एन-६ स्मशानभुमी आणि मौलाना आझाद चौक) (रस्ता दुभाजकासह) | १०००.०० | व्हाईट टॉपींग |
| १० | महानगरपालिका खडकेश्वर वाचनालय ते महानगरपालिका कार्यालय (व्हाया आय.टी.आय. भडकलगेट) पर्यंतचा ९.०० मीटर रुंद विकास योजना रस्ता | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| ११ | निराला बाजार ते खडकेश्वर रस्ता | १५०.०० | व्हाईट टॉपींग |
| १२ | महात्मा फुले चौक ते सावरकर चौक (व्हाया निरालाबाजार) रस्ता | ३५०.०० | व्हाईट टॉपींग व डांबरीकरण |
| १३ | वेणुताई चव्हाण शाळा, एन-८ ते रायगड कॉलनी (मार्गे आदिवासी मुलांचे वस्तीगृह) एन-८ मनपा दवाखाना ते राणाजी मंगल कार्यालय | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| १४ | संत एकनाथ रंगमंदिर ते शहा कॉलनी रस्ता | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| १५ | पंचवटी ते रेल्वेस्टेशन रस्ता | १०००.०० | व्हाईट टॉपींग |
| १६ | विजयनगर ते कालीकामाता मंदिर ते बाळकृष्ण नगर ते गारखेडा नाथप्रांगण | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| १७ | कटकटगेट जवळील पुलाचे रुंदीकरण करुन सभोवतालचा रस्ता विकास करणे | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| १८ | चंपाचौक ते दमडी महल पुला पर्यंत रस्त्याचे काम करणे | ८००.०० | व्हाईट टॉपींग |
| १९ | वार्ड क्र.४० गणेशनगर सिडको अंतर्गत एन-८ भागातील आझाद चौक ते बजरंग चौक ते देवगिरी बँक एन-७ या १८.०० मीटर रुंद विकास रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | ३००.०० | व्हाईट टॉपींग |
| २० | सिडको एन-९ एम-२ रस्ता रायगड नगर मार्गे पार्श्वनाथ चौक १५.०० मीटर रुंद विकास रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| २१ | हडको एन-१२ अण्णाभाऊ साठे चौक ते हडको कॉर्नर पर्यंतचा ३०.०० मीटर रुंद विकास रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | ३००.०० | व्हाईट टॉपींग |

इति.स.सा.सभा दिनांक १०.०५.२०१६
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२०)

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | सिडको एन-५ बजरंग चौक ते अविष्कार चौक ते चिश्तीया पोलीस चौकी पर्यंतच्या २४.०० मीटर रुंद विकास रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | ३५०.०० | व्हाईट टॉपींग |
| २३ | कलेक्टर ऑफिस ते सलीम अली सरोवर रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | ६००.०० | व्हाईट टॉपींग |
| २४ | शहागंज चमन ते निजामउद्दीन दर्गा ते चंपा चौक | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| २५ | शहाबाजार रविंद्रनगर ते कटकटगेट रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| २६ | राज हाईट एम.जी.एम. ते एन-५ पाण्याच्या टाकी पर्यंत रस्ता | ३४०.०० | व्हाईट टॉपींग |
| २७ | जवाहरनगर पोलीस स्टेशन ते सावरकर चौक पर्यंतचा मुख्य रस्ता | ५७०.०० | व्हाईट टॉपींग |
| २८ | देवानगरी ते पिरबाजार रस्ता मार्ग प्रतापनगर स्मशानभुमी | २९०.०० | व्हाईट टॉपींग |
| २९ | जानकी हॉटेल ते सुधाकरराव नाईक चौक २४ मीटर विकास योजना रस्ता | ७५०.०० | व्हाईट टॉपींग |
| ३० | आनंद गाडे चौक ते वेदांत चौक पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | ४५०.०० | व्हाईट टॉपींग |
| ३१ | कामगार चौक ते हायकोर्ट भिंतीपर्यंत | २५०.०० | व्हाईट टॉपींग |
| ३२ | महाविर चौक ते दिल्लीगेट व्हीआयपी रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | १७७०.०० | व्हाईट टॉपींग |
| ३३ | काला दरवाजा ते रोहीलागल्ली रस्त्याचे व्हॉईट टॉपिंग करणे. | १००.०० | व्हाईट टॉपींग |
| ३४ | लोटाकांरजा चौक ते व्हीआयपी रस्त्या पर्यंत रस्त्याचे व्हॉईट टॉपिंग करणे. | १००.०० | व्हाईट टॉपींग |
| ३५ | टिबी हॉस्पिटल ते आसेफीया कॉलनी रस्त्याचे व्हॉईट टॉपिंग करणे. | ३३०.०० | व्हाईट टॉपींग |
| ३६ | पडेगांव मुबंई हायवे ते कत्तलखाना रस्त्याचे व्हॉईट टॉपिंग करणे. | ४५०.०० | व्हाईट टॉपींग |
| ३७ | पंचकुवॉ कब्रस्थान जवळील कीलेअर्क नाल्यावर आरसीसी पुल बांधणे | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| ३८ | पाठक फोटो स्टुडीओ ते नेहरूभवन पर्यंत रस्ता व्हाईट टॉपींग करणे. | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| ३९ | नंदनवन कॉलनी ते लिटलफ्लॉवर शाळे पर्यंत व्हाईट टॉपींग रस्ता | ४०५.०० | व्हाईट टॉपींग |
| ४० | औरंगपूरा भाजी मंडई ते बारुदगरनाला ते सिटीचौक रस्त्यापर्यंतचे रस्त्याचे काम करणे. | २००.०० | व्हाईट टॉपींग |
| | **एकुण** | **१,५२२५.००** | |

मा.महापौर :दुरूस्तीसह मंजुर.

इति.स.सा.सभा दिनांक १०.०५.२०१६
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२०)

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराचे ऐतिहासिक,शैक्षणिक, औद्योगिक महत्व विचारात घेता, शहरातील रस्ते चांगल्याप्रतीचे व वाहतुकीस सुलभ असावेत यासाठी रस्त्यांचे व्हॉईट टॉपींग कॉंक्रीटद्वारे अथवा डांबरीकरणाद्वारे पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. म्हणुन प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे रस्त्यांच्या कामाकरीता ढोबळमानाने रक्कम रुपये 150 कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात येते.

रस्त्याचे सविस्तर सर्वेक्षण करून विस्तृत प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करण्यासाठी पी.एम.सी./प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) यांची निविदेद्वारे नियुक्ती करण्यास व निविदापुर्व व निविदापश्चात कामे पी.एम.सी.मार्फत करून घेण्यास मान्यता देण्यात येते.

प्रशासनाकडून प्रस्तावासोबत सादर केलेल्या रस्त्यांच्या यादीमध्ये फेरबदल करण्यात येत असून; खाली नमूद केलेल्या सुधारित यादीस मान्यता देण्यात येते. पी.एम.सी.ची नियुक्ती झाल्यानंतर त्यांचेकडून सुधारित यादीतील रस्त्यांच्या कामांची सविस्तर अंदाजपत्रके आणि आराखडे तयार करण्यात यावेत. तद्नंतर निविदा प्रक्रिया करावी. सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या रस्त्यांच्या यादीतील प्राधान्यक्रमानुसार कामे हाती घेण्यात यावीत.

सदरील कामे डिफर्ड पेमेंट तत्वावर महानगरपालिकेच्या स्वत:च्या निधीमधुन हाती घेणेस मान्यता देण्यात येते. डिफर्ड पेमेंटचा कालावधी तीन वर्षाचा ठेवण्यात यावा. सदरील कामांचा योग्य समन्वय राहावा आणि कामे दर्जेदार व्हावीत याकरीता संपुर्ण प्रकल्प किंमत रु. 150 कोटीची एकच एकत्रित निविदा करून कामे करुन घ्यावी. त्याचप्रमाणे असेही सुचित करण्यात येते की, सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या रस्त्यांच्या यादीमधील कामे करण्यासाठी शासनाकडून निधी/अनुदान प्राप्त करण्यासाठी प्रशासनाने सविस्तर प्रस्ताव शासनाकडे सादर करून निधी प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावेत. शासन अनुदान/निधी प्राप्त झाल्यानंतर त्यातून सदर कामांचा खर्च भागविण्यास मंजुरी देण्यात येते. रस्त्यांची यादी खालीलप्रमाणे.

**औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध मुख्य व अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे. (आकडे लाखात)**

| अ.क्र | रस्त्याचे नांव | अंदाजे खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | नाथनगर, शिवशंकर कॉलनी येथे नाल्यावर पुल बांधणे. | 125.00 | |
| 2. | मोंढा नाका, जालना रोड ते तानाजी चौक मार्गे पेशवा हॉटेल-कंधारकर हॉस्पिटल-टिळकनगर-तानाजीचौक-सायली हॉटेल ते सिंधी कॉलनी मार्गे गुरुद्वारा कमान जालना रोड पर्यंत अंतर्गत मुख्य रस्त्यासह रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 500.00 | |
| 3. | आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक ते चेतक घोडा आणि गजानन महाराज मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 440.00 | **शहराच्या मध्यवर्ती भागातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग जालना रोड कडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 4. | जवाहरनगर पोलीस स्टेशन ते सावरकर चौक (मार्गे चेतक घोडा) पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 950.00 | **शहानुरमिया दर्गा, रेल्वेस्टेशन व जालना रोडकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 5. | वाणी मंगल कार्यालय ते फोस्टर कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 150.00 | |
| 6. | कामगार चौक ते हायकोर्ट पुर्व बाजुच्या भिंतीलगत जालना रोड पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 250.00 | |
| 7. | साई ट्रासपोर्ट एन-३ ते एम.एस.ई.डी.सी.एल. पॉवर हाऊस (मार्गे अजयदिप कॉम्प्लेक्स, एन-४) पर्यंत १५ मीटर रुंद रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 150.00 | |
| 8. | जानकी हॉटेल ते मेहरसिंग नाईक हायस्कुल २४ मीटर विकास योजना रस्त्याचे व्हाईट टॉपींगचे काम करणे. | 400.00 | |

इति.स.सा.सभा दिनांक १०.०५.२०१६
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२०)

| अ.क्र | रस्त्याचे नांव | अंदाजे खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| 9. | पीरबाजार ते शिवाजीनगर (व्हाया एकता चौक) रस्त्याचे व्हाईट टॉपींग व डांबरीकरण करणे. | 1000.00 | **विभागीय क्रीडा संकुल, शहानुरमियॉ दर्गा, रेल्वेस्टेशनकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 10. | एन-४ श्री नागरे यांच्या घरापासून पुंडलीकनगर पाण्याच्या टाकीकडे जाणाऱ्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 100.00 | |
| 11. | जळगांव रोड ते ए.पी.एम.सी. हद्दीपर्यंत ३६ मी. रुंदीचा डी.पी.रस्ता तयार करणे. | 400.00 | |
| 12. | निराला बाजार ते खडकेश्वर पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 150.00 | **शहराच्या मध्यवर्ती भागातुन खडकेश्वर मंदिर, बिबी-का-मकबरा, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, सोनेरी महल विद्यापीठ परिसर कडे जाणारा एक रस्ता** |
| 13. | एन-१ पोलीस चौकी ते प्रोझोन मॉल पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपींग करणे | 100.00 | |
| 14. | चौसरनगर ते महादेव मंदिर दशमेशनगर पर्यंतचा १५.०० मीटर रुंद रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 100.00 | |
| 15. | महालक्ष्मी चौक ते सोहम मोर्टस (जालना रोड) पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 250.00 | **चिकलठाणा औद्योगीक परिसर व शहराच्या मध्यवर्ती भागातुन चिकलठाणा विमानतळाकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 16. | एन-६ स्मशानभूमी (सेंट्रल नाका) ते टि.व्ही. सेंटर रस्ता (व्हाया मौलाना आझाद चौक) पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 900.00 | **मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र व सलीम अली सरोवर कडे जालना रोड वरुन जाण्यासाठीचा एक मार्ग** |
| 17. | महानगरपालिका खडकेश्वर वाचनालय ते महानगरपालिका कार्यालय (व्हाया आय.टी.आय.भडकलगेट) पर्यंतचा ९.०० मीटर रुंद विकास योजना रस्ता. | 200.00 | **शहराच्या मध्यवर्ती भागातून बिबीका मकबरा, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, सो-नेरी महल विद्यापीठ परिसर कडे जाणारा एक रस्ता** |
| 18. | संत एकनाथ रंगमंदिर ते शहा कॉलनी पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 200.00 | |
| 19. | भगवान महाविरस्तंभ चौक ते रेल्वेस्टेशन चौका पर्यंतच्या (मार्गे महापौर निवासस्थान) रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 700.00 | **पर्यटक व नागरिकांना रेल्वेस्टेशन व पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यान तसेच जायकवाडी धरणाकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 20. | एन-१ पोलीस चौकी ते सिडको बसस्टॅन्ड ते ऑटोमोटीव्ह व्हाया दैनिक सकाळ रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे | 200.00 | **पर्यटक व बाहेरुन येणा ऱ्या नागरिकांचा वर्दळीचा एक रस्ता** |
| 21. | विजयनगर ते कालीकामाता मंदिर ते बाळकृष्णनगर ते गारखेडा नाथप्रांगण पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 100.00 | |
| 22. | चंपाचौक ते दमडी महल ते गुलशन महल पर्यंतच्या रस्त्या डांबरीकरणाद्वारे करणे | 300.00 | **जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय व सलीम अली सरोवर तसेच जळगांवकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |

इति.स.सा.सभा दिनांक १०.०५.२०१६
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२०)

| अ.क्र | रस्त्याचे नांव | अंदाजे खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| 23. | वार्ड क्र.४० गणेशनगर सिडको अंतर्गत एन-८ भागातील आझाद चौक ते बजरंग चौक ते देवगिरी बँक एन-७ या १८.०० मीटर रुंद विकास रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 300.00 | |
| 24. | हडको एन-१२ अण्णाभाऊ साठे चौक ते हडको कॉर्नर ताज हॉटेल पर्यंतचा ३०.०० मीटर रुंद विकास रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 300.00 | **जैन मंदिर जटवाडा, हर्सुल तलाव, स्मृतीवन व जळगांवकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 25. | बळीराम पाटील शाळा ते चिश्तिया चौक पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 350.00 | **मा.उच्च न्यायालय, सिडको बसस्टँड व गजानन महाराज मंदिरकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 26. | कलेक्टर ऑफिस ते सलीम अली सरोवर रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 550.00 | **मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र व सलीम अली सरोवर कडे जाण्यासाठीचा एक मार्ग** |
| 27. | शहागंज चमन ते निजामउद्दीन दर्गा ते चंपा चौक रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 200.00 | **शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेस जाण्याचा एक रस्ता** |
| 28. | राज हाईट एम.जी.एम. ते एन-५ पाण्याच्या टाकी, चिश्तिया चौकापर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 340.00 | **गजानन महाराज मंदिर व सिडको परिसराकडे जाण्यासाठीचा एक महत्वाचा रस्ता** |
| 29. | पीरबाजार रस्ता ते प्रतापनगर स्मशानभुमी पुलापर्यंत व्हॉईट टॉपींग रस्ता करणे. | 150.00 | |
| 30. | पिरबाजार चौक (आनंद गाडे चौक) ते वेदांत चौक पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 450.00 | **रेल्वेस्टेशन, रेल्वे औद्योगीक वसाहत व पैठण शहरातील संत ज्ञानेश्वर उद्यान, जायकवाडी धरणाकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 31. | पडेगांव (नाशिक-मुबंई हायवे) ते मॉर्डन ॲबॉटर पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 400.00 | |
| 32. | महात्मा फुले चौक औरंगपुरा ते नेहरु भवन, सिटी क्लब आणि औरंगपूरा भाजी मंडई ते सिटी चौक पर्यंत (मार्गे सुराणा कॉम्प्लेक्स) रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 250.00 | **शहराच्या मध्यवर्ती भागातुन बिबीका मकबरा, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, सोनेरी महल विद्यापीठ परिसर कडे जाणारा एक रस्ता** |
| 33. | नंदनवन कॉलनी ते लिटलफ्लॉवर शाळे पर्यंत व्हाईट टॉपींग रस्ता. | 300.00 | |
| 34. | मनपा मुख्यालय ते राम मंदिर किराडपुरा या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 400.00 | **सिडको व चिकलठाणा औद्योगीक वसाहतीकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 35. | एम.जी.एम. ते संस्थान गणपती मंदिर, राजाबाजार (मार्गे इंदिरानगर) पर्यतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 400.00 | |
| 36. | अग्रसेन चौक ते सेट्रल एक्साईज कार्यालय पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 200.00 | |

| अ.क्र | रस्त्याचे नांव | अंदाजे खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| 37. | हर्सुल जेल ते स्मृतीवन (हर्सुल तलाव पर्यंत) पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 450.00 | |
| 38. | हॉटेल अमरप्रित चौक ते शहानुरमियॉ दर्गा एकता चौक मार्गे सावरकर चौक पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 1050.00 | |
| 39. | जालना रोड माँ साहेब चौक रामनगर ते विमानतळ संरक्षित भिंती पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 300.00 | |
| 40. | अहिल्याबाई होळकर चौक ते शिवाजीनगर कडे जाणाऱ्या १८ मीटर रुंद रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | 150.00 | |
| 41. | एम.आय.टी.कॉलेज ते सातारा खंडोबा मंदिराजवळील रस्ता पुला पर्यंतच्या रस्त्याचे काम करणे. | 200.00 | **सातारा येथील खंडोबा मंदिरकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 42. | गुलमंडी, औषधीभवन ते पैठणगेट लोकमान्य टिळक पुतळया पर्यंतच्या रस्त्याच्या व्हाईट टॉपींग करणे (पुलासह) | 250.00 | **विधी महाविद्यालय, तापडीया नाट्य मंदिर, सरस्वती भुवन महाविद्यालयकडे जाण्यासाठीचा एक रस्ता** |
| 43. | देवळाई भागातील बीड बायपास रोड संभाजी चौक येथुन ते देवळाई गावापर्यंत भागशः व्हॉईट टॉपिंग रस्ता तयार करणे. | 100.00 | |
| 44. | बिबिका मकबरा ते मकाई गेट पुलापर्यंत व्हाईट टॉपींगचे काम करणे | 245.00 | **बिबिका मकबरा या प्रमुख पर्यटन स्थळाकडे जाणारा मुख्य रस्ता** |
| | एकुण | 15,000.00 | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३४:-**

उपआयुक्त (मालमत्ता), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, जालना रोड, औरंगाबाद येथील न.भु.क्र.१५३०२/१२, गारखेडा परिसरातील नुपूर अपार्टमेंट शेजारील महानगरपालिका व्यापारी संकुलातील दुकानासाठी जाहिर निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या असता त्यापैकी फक्त दुकान क्र.५ साठी तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्या खालील प्रमाणे.

| अ.क्र. | नाव | दुकानासाठी प्रतिमहा भरणा केलेली रक्कम |
|---|---|---|
| १. | श्री. फाटके निलेश रावसाहेब | ५२००/- (पाच हजार दोनशे) |
| २. | श्री. काटे सुनिल किशनराव | ५१००/- (पाच हजार एकशे) |
| ३. | श्री. शिंदे ज्ञानेश्वर उत्तमराव | ५०००/- (पाच हजार) |

त्यापैकी सर्वात जास्त दराची निविदा श्री.फाटके निलेश रावसाहेब यांनी प्रतीमहा ५२००/- देणेसाठी निविदा भरली आहे. हा दर सर्वात जास्त असल्यामुळे सदर दरास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता होणे आवश्यक असल्याने, प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास नेहमीच्या अटी शर्तीनूसार करारनामा करुन घेण्यात येईल.

मा.महापौर : ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड, औरंगाबाद येथील न.भु.क्र.१५३०२/१२, गारखेडा परिसरातील नुपूर अपार्टमेंट शेजारील महानगरपालिका व्यापारी संकुलातील दुकानासाठी जाहिर निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या असता त्यापैकी फक्त दुकान क्र.५ साठी सर्वात जास्त दराची निविदा श्री.फाटके निलेश रावसाहेब यांनी प्रतीमहा ५२००/- देणेसाठी निविदा भरलेली असल्याने या

दरास तसेच नेहमीच्या अटी शर्तीनुसार करारनामा करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बीड-बायपास परिसरातील शिवाजीनगर ते देवळाई चौककडे जाणाऱ्या रस्त्यावरील **देवळाई चौकास "श्रीराम चौक"** असे नाव देण्यात यावे. अशी मागणी या भागातील नागरीक करीत आहे.

करीता बीड-बायपास रोडवरील शिवाजीनगर कडे जाणाऱ्या रस्त्यावरील **देवळाई चौकास "श्रीराम चौक"** असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अप्पासाहेब हिवाळे पाटील **अनुमोदक:-** श्रीमती शिल्पाराणी वाडकर

मा.महापौर : ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बीड-बायपास रोडवरील शिवाजीनगर कडे जाणाऱ्या रस्त्यावरील **देवळाई चौकास "श्रीराम चौक"** असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर विकास आराखडयावर आलेल्या आक्षेपांची सुनावणी घेण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम-२८ (२) अन्वये गठित करण्यात आलेल्या नियोजन समितीमध्ये स्थायी समितीचे तीन सदस्य श्री दिलीप गंगाधर थोरात, श्री खान इर्शाद इब्राहीम व श्री गजानन मनगटे याची नियुक्ती करण्यात आलेले होती.

तथापि दिनांक ०१ मे २०१६ रोजी श्री दिलीप गंगाधर थोरात व श्री खान इर्शाद इब्राहीम हे स्थायी समितीचे दोन सदस्य निवृत्त झालेले आहेत.

करिता निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नियुक्ती करण्याची कारवाई तात्काळ करण्यात यावी.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे **अनुमोदक:**-श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.भगवान (बापू) घडामोडे

**ठराव :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या दि. २८.०१.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र २६९ अन्वये विकास योजनेच्या मसुद्यावर प्राप्त झालेल्या सूचना किंवा हरकती यांचा विचार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम-२८ (२) अन्वये गठित करण्यात आलेल्या नियोजन समितीमध्ये स्थायी समितीचे तीन सदस्य श्री दिलीप गंगाधर थोरात, श्री खान इर्शाद इब्राहीम व श्री गजानन मनगटे याची नियुक्ती करण्यात आलेले होती.

तथापि दिनांक ०१ मे २०१६ रोजी श्री दिलीप गंगाधर थोरात व श्री खान इर्शाद इब्राहीम हे स्थायी समितीचे दोन सदस्य निवृत्त झालेले आहेत.

औरंगाबाद महानगरपालिकेचा विकास आराखडा प्रसिध्द करुन त्यावर नागरिकांच्या आक्षेप व सूचना मागविण्यात आलेल्या आहेत. सदरील आक्षेप व सूचनांची सुनावणी करणे कामी गठित करण्यात आलेल्या समितीत निवृत्त झालेल्या स्थायी समितीच्या सदस्यांच्या जागी नवीन सदस्य नियुक्त करणे आवश्यक आहे.

स्थायी समितीच्या निवृत्त झालेल्या दोन सदस्यांच्या जागी श्री राजगौरव वानखेडे व श्री अजिम अहेमद रफिक या दोन स्थायी समितीच्या सदस्यांची नियुक्ती करण्यात येते.

१. श्री गजानन मनगटे,
२. श्री राजगौरव वानखेडे
३. श्री अजिम अहेमद रफिक

हे स्थायी समितीचे सदस्य नियोजन समितीचे सदस्य असतील.

उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेल्या बदला बाबत शासनास व संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात यावे.

**विषय क्रमांक ४३७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा देवळाई परिसरातील देवळाई खडीरोड-हॉटेल मौर्य ते जयभवानीनगर कडे जाणाऱ्या रस्त्यावरील बीड-बायपास जवळील चौकास **“छत्रपती संभाजी राजे चौक”** असे नाव देण्यात यावे. अशी मागणी या भागातील नागरीक करीत आहे.

देवळाई खडीरोड-हॉटेल मौर्य ते जयभवानीनगर कडे जाणाऱ्या रस्त्यावरील बीड-बायपास जवळील चौकास **“छत्रपती संभाजी राजे चौक”** असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अप्पासाहेब हिवाळे पाटील **अनुमोदक:-** श्रीमती शिल्पाराणी वाडकर

मा.महापौर : ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सातारा-देवळाई खडीरोड-हॉटेल मौर्य ते जयभवानीनगर कडे जाणाऱ्या रस्त्यावरील बीड-बायपास जवळील चौकास **“छत्रपती संभाजी राजे चौक”** असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील समाविष्ठ कामांचे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र. मुळ काम | अ.क्र | सुधारित काम | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|
| १ | १०७ अंतर्गत विटखेडा स्मशानभुमीची देखभाल/दुरूस्ती विकास SCR/WA-F/Page N0.५१ | १ | साई वृंदावन कॉलनी पैठणरोड भाग-२ मध्ये डांबरीकरण करणे | १५.०० |
| २ | १०७ अंतर्गत विटखेडा साईवृंदावन कॉलनी मंजुर रेखांकनात भागात जलनि:सारण वाहिनी टाकणे. Lay Out-New Work Page No.12 | २ | प्रभाग क्र.१०७ श्रीरंग सिटी या वसाहतीतील भागात जलनि:सारण वाहिनी टाकणे | १०.०० |

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले. **अनुमोदक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील समाविष्ठ कामांचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र. मुळ काम | अ क्र | सुधारित काम | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|
| १ | १०७ अंतर्गत विटखेडा स्मशानभुमीची देखभाल दुरूस्ती विकास SCR/WA-F/Page N0.५१ | १ | साई वृंदावन कॉलनी पैठणरोड भाग-२ मध्ये डांबरीकरण करणे | १५.०० |
| २ | १०७ अंतर्गत विटखेडा साई वृंदावन कॉलनी मंजुर रेखांकनात भागात जलनि:सारण वाहिनी टाकणे. Lay Out-New Work Page No.12 | २ | प्रभाग क्र.१०७ श्रीरंग सिटी या वसाहतीतील भागात जलनि:सारण वाहिनी टाकणे | १०.०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४३९:-</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, शहराची लोकसंख्या सुमारे १५ लक्षच्या आसपास आहे. लोकसंख्येचे प्रमाण वाढलेले असून शहराचा विस्तार देखील वाढलेला आहे. सातारा व देवळाई नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आले आहे. नागरिकांना पुरवावयाच्या सोयी सुविधांची देखभाल दुरुस्ती आणि नव्याने बांधणीची कामे करणे,बांधकामांना परवानगी देणे,गुंठेवारी वसाहती नियमित करणे,शहरातील बेकायदेशीर बांधकामे निष्कासित करणे, रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे,मालमत्ता कर वसुली करणे,नागरिकांना विविध ऑनलाईन सुविधा पुरविणे, प्राणिसंग्रहालयाच्या नवीन योजना व विकास करणे, अनधिकृत मांस विक्रीवर प्रतिबंध घालणे, नवीन अग्निशमन केंद्राची उभारणी करणे, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करणे इत्यादी विविध प्रकारची कामे करण्यासाठी, कामाची गुणवत्ता राखण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची अत्यंत आवश्यकता आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सद्यस्थितीत वर्ग-२ संवर्गात एकूण २५ व वर्ग-३ संवर्गात एकूण ३०२ पदे रिक्त आहेत. सन २००८ पासून सरळसेवेने रिक्त असलेली पदे भरण्यात आलेली नाहीत. तसेच प्रतिवर्षी नियत वयोमानाने, स्वेच्छा सेवानिवृत्ती, मयत इ. मुळे अधिकारी/ कर्मचाऱ्यांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे सद्यस्थितीत कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. सध्या मंजूर असलेली पदसंख्या ही अत्यंत अपुरी असल्याने महानगरपालिकेच्या नियोजन व विकास कामांवर विपरीत परिणाम होत आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१०/८४/१०/विसु-१, दि.२७/९/२०१० व वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दि.२/२/२०१३ नुसार प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बाह्य यंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) कामे करुन घेण्याबाबत आवश्यक सुचना दिलेल्या आहेत.

उक्त बाबी लक्षात घेता, महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी बाह्य यंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरविण्याकरिता सर्व तपशिल खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येते.

| अ. | भरावयाचे पद | भरावयाची | सहाव्या वेतन | कंत्राटी पध्दतीने देय |
|---|---|---|---|---|

| क्र. | | पदसंख्या | आयोगानुसार होणारे एकत्रित वेतन | | होणारे वेतन | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एका पदाचे वेतन सुमारे | एकूण पदांचे वेतन सुमारे | एका पदाचे वेतन सुमारे | एकूण पदांचे वेतन सुमारे |
| १. | उप अभियंता (स्थापत्य) | ०३ | ५०,००० | १,५०,००० | ३५,००० | १,०५,००० |
| २. | उप अभियंता (विद्युत) | ०१ | ५०,००० | ५०,००० | ३५,००० | ३५,००० |
| ३. | उप अभियंता (यांत्रिकी) | ०१ | ५०,००० | ५०,००० | ३५,००० | ३५,००० |
| ४. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | २५ | ३४,००० | ८,५०,००० | २३,८०० | ५,९५,००० |
| ५. | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | ०८ | ३४,००० | २,७२,००० | २३,८०० | १,९०,४०० |
| ६. | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | ०५ | ३४,००० | १,७०,००० | २३,८०० | १,१९,००० |
| ७. | दुय्यम आवेक्षक (स्थापत्य) | १५ | २७,००० | ४,०५,००० | १८,९०० | २,८३,५०० |
| ८. | दुय्यम आवेक्षक (विद्युत) | ०३ | २७,००० | ८१,००० | १८,९०० | ५६,७०० |
| ९. | दुय्यम आवेक्षक (यांत्रिकी) | ०३ | २७,००० | ८१,००० | १८,९०० | ५६,७०० |
| १०. | आरेखक | ०३ | ३२,००० | ९६,००० | २२,४०० | ६७,२०० |
| ११. | स्वच्छता निरिक्षक | २० | २७,००० | ५,४०,००० | १८,९०० | ३,७८,००० |
| १२. | लिपीक-टंकलेखक | १० | १८,५०० | १,८५,००० | १२,९०० | १,२९,००० |
| | **एकूण** | **९७** | ४,१०,५०० | २९,३०,००० | २,८७,३०० | २०,५०,५०० |

वरीलप्रमाणे एकूण ९७ पदे कंत्राटी पध्दतीने भरल्यास मासिक रु.२०.५० लक्ष व वार्षिक रु.२ कोटी ४६ लाख एवढा खर्च येईल.

करिता उक्त प्रमाणे सर्व आवश्यक कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरविण्याकरिता निविदा प्रक्रिया अंतिम करणे व महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार संबधित एजन्सीकडून कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरविण्याकरिता नोंदणीकृत व्यावसायिक अभिकर्त्यामार्फत निविदा मागविणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सद्यस्थितीत कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१०/८४/१०/विसु-१, दि.२७/९/२०१० व वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दि.२/२/२०१३ नुसार प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बाह्य यंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) कामे करुन घेण्याबाबत आवश्यक सुचना दिलेल्या आहेत. महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी बाह्य यंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरविण्याकरिता प्रस्तावात दर्शविलेल्या अनुक्रमांक १ ते १२ प्रमाणे कुशल व अकुशल

मनुष्यबळ पुरविण्याकरिता निविदा प्रक्रिया अंतिम करणे व महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार संबंधित एजन्सीकडून कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरविण्याकरिता नोंदणीकृत व्यावसायिक अभिकर्त्यामार्फत निविदा मागविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिवशंकर कॉलनी व नाथनगर या भागातील रस्त्यांचे कॉंक्रेटींग करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ मधून करणे करिता रु.५० लाखाचा निधीचा प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला आहे. या रस्त्याच्या विकासासाठी महानगरपालिकेमार्फत खर्च करण्यात येणाऱ्या ५० टक्के रक्कमेची तरतुद महानगरपालिका अर्थसंकल्पात करण्यात यावी व तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात यावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नितीन दशरथ साळवी, **अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ मधून शिवशंकर कॉलनी व नाथनगर या भागातील रस्त्याच्या विकासासाठी रु.५० लाखाची तरतुद महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात करण्यास मंजुरी देण्यात येते तसेच याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एम.आय.डी.सी. सिडको भागामध्ये महानगरपालिकेचे गरवारे क्रीडा संकुल असुन सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. यामध्ये दोन पॅव्हेलियन, येणाऱ्या खेळांडूना थांबण्यासाठी वसतीगृह व दोन सिक्युरिटी कॅबीनचा इत्यादीचा समावेश आहे. येथील क्रीडांगणाचे एकुण क्षेत्र १११९८० चौ.मी. असुन पैकी सुमारे २४४१.१४२ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. गरवारे क्रीडा संकुल शहरातील महत्वाचे खेळाचे मैदान असुन या ठिकाणी वर्षभर नियमित रित्या खेळाडू सराव करीत असतात तसेच येथे विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. औरंगाबाद शहर ऐतिहासिक आणि पर्यटन दृष्टया महत्वाचे शहर असुन या ठिकाणी विविध राज्यस्तरीय स्पर्धा होत असतात. सदयस्थिती मध्ये जे मैदान आहे त्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात पाण्याची तसेच खेळाडुंना सराव करण्यासाठी क्रिकेटची योग्य अशी खेळपट्टी नसल्याने खेळाडुंची गैरसोय होत आहे. या शिवाय या ठिकाणी पाण्याची कमतरता असल्याने या क्रींडागणामध्ये लॉन लावणे व त्याची नियमित देखभाल करणे पुरेशा क्षमतेने शक्य होत नाही. त्यास्तव तसेच वर नमुद प्रमाणे सदर मैदानाचा स्तर वाढविण्यासाठी व भविष्यात हे मैदान विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा तसेच रणजी ट्रॉफी खेळवता येतील या साठी योग्य दर्जाची खेळपट्टी तयार करणे आवश्यक आहे.

त्यानुसार या स्टेडीयमच्या नुतनीकरणा अंतर्गत खालील कामे करावयाची आहेत.

**भाग अ :- अ.प.रक्कम रु. १,३९,३७,८४२/-**

| अ.क्र | कामाचा तपशिल |
|---|---|
| ०१ | सुमारे १९० मीटर व्यासाचे गोलाकार मैदान क्रिकेटसाठी विकसीत करणे |
| ०२ | मध्यभागी ३० मी.X३० मी आकाराची मुख्य क्रिकेट खेळाची खेळपट्टी तयार करणे |
| ०३ | या मैदानाच्या चारही दिशेला २१ मी X२१ मी आकाराच्या सराव खेळपट्टया तयार करणे |
| ०४ | मैदानामध्ये स्प्रिंकलर सिस्टीम बसविणे,व त्यासाठी लागणारे पंप बसविणे |

**भाग ब:- अ.प.रक्कम रु. ३९,७८,०००/-**

| अ.क्र | कामाचा तपशिल |
|---|---|
| ०१ | मैदानाच्या परिसरात पाण्याची नियमित व पुरेशी उपलब्धता असावी यासाठी जमीनीत सुमारे ७० हजार लिटर क्षमतेचा आर.सी.सी. हौद तयार करणे, |
| ०२ | मैदानाच्या गोलाकार भागात कडेने पाण्याचा निचरा होण्यासाठी आर.सी.सी गटार बांधणे,व एम.एस.जाळी बसविणे |
| ०३ | आर.सी.सी. हौदाच्या वर पंप हाऊस तयार करणे, |

**भाग क :- अ.प.रक्कम रु. २७,०९,७६०/-**

| अ.क्र | कामाचा तपशिल |
|---|---|
| ०१ | क्रिकेटच्या पिच ची देखभाल करण्यासाठी पिच लॉन मुव्हर खरेदी करणे |
| ०२ | अत्याधुनिक पध्दतीचे सिलेंडर लॉन मुव्हर खरेदी करणे |
| ०३ | ग्रास कटर खरेदी करणे |
| ०४ | हॅण्ड रोलर खरेदी करणे |

इत्यादी कामे करावयाचे असुन,यातील स्थापत्य विषयक कामासह कामाची एकुण रक्कम खालील रकान्यात नमुद प्रमाणे होत आहे.

| | |
|---|---|
| ०१ | **भाग अ** ची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,३९,३८,०००/- एवढी होत आहे. |
| ०२ | **भाग ब** ची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३९,७८,०००/- आहे |
| ०३ | **भाग क** ची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रु.२७,०९,७६०/- एवढी होत आहे. |

अशा प्रकारे या कामासाठी एकुण अ.प.रक्कम रु. २,०६,२५,६०२/- एवढा खर्च अपेक्षित आहे. या अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक कामासाठी सा.बां.विभागाच्या सन २०१५-१६ ची दरसुची वापरण्यात आली असुन, मैदानाच्या भागात स्प्रिंकलर सिस्टीम बसविण्याचे दर व वरील भाग क मधील अंदाजपत्रकानुसार साहित्य खरेदीचे दर (Non DSR Item) अंदाजपत्रकासाठी या क्षेत्रातील तज्ञ व्यवसायीकाकडून घेतले आहेत. त्यानुसार त्याचा समावेश करुन अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत. या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी शिफारस करण्यात येत असुन या कामाचा खर्च शासन निर्णय क्रमांक-सकिर्ण-२०१५/प्र.क्र.८०/नवि-१६ मुंबई-३२ दिनांक १७ नोव्हेबर २०१५ नुसार महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोईसुविधांचा विकास करणेसाठी मंजुर करण्यात आलेल्या रु.१०.०० कोटी च्या प्रकल्पामध्ये शासनाचा ५०% हिस्सा म्हणजेच रु.५.०० कोटी प्राप्त होणार असून उर्वरीत ५०% म्हणजेच रु. ५.०० कोटी महानगरपालिकेस स्वत:चा हिस्सा म्हणून टाकावयाचा आहे. यातून या प्रकल्पासाठी लागणारा खर्च ५०:५० या प्रमाणात भागविण्यात येणार आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या हिश्यापोटी टाकावयाच्या रक्कमेसाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी महानगरपालिकेच्या गरवारे क्रीडांगण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,०६,२५,६०२/- च्या एकत्रित अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या गरवारे क्रिडांगण विकासासाठी भाग-अ, भाग-ब व भाग-क च्या कामांसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये २,०६,२५,६०२/- च्या एकत्रित अंदाजपत्रकास शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०१५/प्र.क्र.८०/नवि-१६ मुंबई-३२ दिनांक १७ नोव्हेंबर २०१५ नुसार महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोईसुविधांचा विकास करणेसाठी मंजुर करण्यात आलेल्या रु.१०.०० कोटी अनुदानातून या प्रकल्पाच्या एकुण अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ५०% रक्कम वापरण्यास व उर्वरीत ५०% महानगरपालिकेचा हिस्सा टाकण्यासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्ह्यात क्रिडा संस्कृतीचा विकास व्हावा, विविध खेळ प्रकारातील नवोदित, होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यासाठी व्यासपीठ निर्माण व्हावे, महानगरपालिकेच्या वतीने विविध क्रिडा प्रकारातील खेळाडुंना संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातुन फुटबॉल,व्हॉलीबॉल, खो-खो,कबड्डी, बास्केटबॉल, अॅथेलेटिक्स्, जिम्नॅस्टीक,जलतरण,टेबल टेनिस, बॅटमिंटन,कुस्ती, तलवारबाजी,ज्युदो,ताईक्वांदो,बॉक्सींग,पॉवर लिफ्टींग,स्केटिंग,लॉन टेनिस,बुध्दीबळ, सायकलींग, क्रिकेट, स्नुकर व योगा इत्यादी खेळांसाठी व इतर खेळांसाठी जिल्हास्तरीय महापौर चषक क्रिडा स्पर्धाचे आयोजन यावर्षीच्या जून/जुलै या महिन्यात करण्यात यावे.

महापौर चषक क्रिडा स्पर्धा-२०१६ च्या आयोजनासाठी एकूण रक्कम रूपये १५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा लाख फक्त) ची अर्थसंकल्पात तरतुद करण्यास तसेच महापौर चषक क्रिडा स्पर्धा-२०१६ च्या आयोजनासाठी लागणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच प्रतिवर्षी महापौर चषक क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन दशरथ साळवी,श्री.दिलीप गंगाधर थोरात, श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे.

**अनुमोदक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ,श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापौर चषक क्रिडा स्पर्धा-२०१६ च्या आयोजनासाठी एकूण रक्कम रूपये १५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा लाख फक्त) ची अर्थसंकल्पात तरतुद करण्यास तसेच महापौर चषक क्रिडा स्पर्धा-२०१६ च्या आयोजनासाठी लागणाऱ्या अपेक्षित खर्चास तसेच प्रतिवर्षी महापौर चषक क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**(४४३ हा क्रमांक अनावधानाने सुटलेला आहे. कोणत्याही विषयाला क्रमांक देण्यात आला नाही.)**

**चर्चा:-**

मा.महापौर :क्रांतीचौक रेल्वेस्टेशन रस्त्या विद्युत पोल व फिटींग बाबत अहवाल येणार होता. अहवाल असेल, तर वाचन करावे.

तांत्रिक कक्ष प्रमुख(श्री. काझी): क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्यावर पुर्वी ७२ पोल, १४४ फिटींग होत्या. त्यात क्रांतीचौक ते उस्मानपूरा या स्पेसमध्ये १० पोल. २० फिटींग, उस्मानपूरा ते कोकणवाडी, स्नेहनगर या स्पेसमध्ये ५७ पोल व ५४ फिटींग, कोकणवाडी ते वेदांतनगर या स्पेस मध्ये १७ पोल व ३४ फिटींग, वेदांतनगर ते रेल्वेस्टेशन पर्यत १८ पोल व ३६ फिटींग होत्या. सर्व पोल व फिटींगची विद्युत विभागाने स्टॉक रजिस्टरला नोंद ठेवणे आवश्यक होते. परंतु त्या वेळी स्टॉक रजिस्टर नव्हते. या पोल व फिटींगचा नवीन स्टॉक रजिस्टरवर नोंद घेतली आहे. त्यापैकी २० पोल हे क्रांतीचौक

येथे दुरूस्तीसाठी ठेवले आहे. ६ पोल पदमपुरा येथील फायर स्टेशन मध्ये ठेवले. २५ पोल कोकणवाडी या रस्त्याच्या कडेला लावून ठेवले आहेत. २५ फिटींग कोकणवाडी येथे आहे.

मा.उपमहापौर :या सर्व फिटींग आपण स्वत: बघीतल्या का? पोल पाहिले का ?

तांत्रिक कक्ष प्रमुख (श्री.काझी):पोल बघीतले आहे. ७२ पोल पैकी २५ पोल कोकणवाडी भागात आहे. ३ पोल झ ाशीची राणी उद्यानात ठेवले आहे. १ पोल एमटीडीसी ऑफिस समोर आहे. १० पोल नारेगाव मुख्य रस्त्यासाठी दिले. ७ पोल रेल्वेस्टेशनच्या बाजूलाच शिफ्ट केले. २० पोल क्रांतीचौक येथे दुरूस्तीसाठी आहे. दुरूस्ती म्हणजे पोल काढतांना खालचा भाग तुटलेला असतो. तो जॉईन्ट करावा लागेल.

मा.उपमहापौर :२० पोल माझ्या वार्डासाठी दिले असे म्हटले आहे. ते पोल कुठे आहे.

तांत्रिक कक्ष प्रमुख (श्री.काझी):पोल गायब नाही. आजही त्या ठिकाणी आहे. पुर्वी स्टॉक रजिस्टर नव्हते.

श्री.राजेंद्र जंजाळ :एकच स्टॉक रजिस्टर असायला पाहिजे. तेथून काढून दुसरीकडे लावले? कुणाची परवानगी, मान्यता घेतली संचिका आहे का?

तांत्रिक कक्ष प्रमुख :सर्व तपासणी करीत आहोत. शहरात आणखी १९० पोल विस्तृत पडलेले आहेत. ते सर्व पोल एकत्रिक करणार आहोत.

मा.महापौर :जेवढे पोल निघाले, फिटींग निघाले, तेवढे आम्हाला प्रत्यक्ष दाखवा. चार दिवसात जमा करावे.

तांत्रिक कक्ष प्रमुख :यातील २० फिटींग नारेगाव येथे दिले आहे. पुर्ण पोल व फिटींग दाखवून दिल्या जातील.

मा.महापौर :एका ठिकाणी जमा करावे. दुसरीकडे शिफ्ट केले मान्यता घेतली होती का?

मा.उपमहापौर :पोल शिफ्ट केले. संबंधीत जे होते श्री. देशमुख याची जबाबदारी होती.

श्री.राजेंद जंजाळ :पुढच्या सोमवार पर्यत सर्व पोल व त्यावरील फिटींग स.पदाधिकारी यांना दाखवावे. जर दाखविले नाही तर मनपाची प्रॉपर्टी विकून पैशाचा अपहार केला. गुन्हे दाखल होतील.

मा.महापौर :आताच सुचना केल्याप्रमाणे पोल व फिटींग दाखविण्यात यावे.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२०)**

**मंगळवार दिनांक १०.०५.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.पालिका सदस्य श्री. खान जहाँगीर मुलानी (प्रभाग क्रमांक-२७)**

**प्रश्न क्रमांक ४५४:-**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील समांतर योजने अंतर्गत सिटी वॉटर युटीलीटी कंपनीस मनपातर्फे नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच कंपनीने त्याचे उत्तर सुध्दा दिलेले आहे परंतु सदरील बाब आज पर्यंत प्रशासनाने माझ्या माहिती प्रमाणे स.पदाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिलेली नाही किंवा कोणताही खुलासा केलेला नाही.

करिता प्रशासनाने दिलेली नोटीस व समांतर कंपनीने दिलेल्या उत्तराची सत्यप्रत व सविस्तर माहिती मला लेखी स्वरुपात देण्यात यावी.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद शहराच्या समांतर जलवाहिनी योजनेसंदर्भाने दिनांक २१.०३.२०१६ रोजी मा.सचिव, नवि-२ यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयीन दालनात बैठक संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा.सहसचिव, नवि-३३, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक २४.३.२०१६ रोजीच्या पत्रासह महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे.

महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या कार्यवृत्तामध्ये “महानगरपालिकेने नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार करारनाम्यातील तरतुदींनुसार कन्सेशनरला १५ दिवसांच्या कालावधींची नोटीस देऊन त्याबाबत त्याचा खुलासा घेण्याची कार्यवाही करावी व त्यानंतर त्यांचा येणारा खुलासा विचारात घेऊन या प्रकल्पा संदर्भात पुढील कार्यवाही बाबतचा प्रस्ताव महानगरपालिके समोर ठेवून महानगरपालिकेने याबाबत आवश्यक तो निर्णय घ्यावा. असे करतांना महानगरपालिकेने आवश्यक तो विधी व वित्त विषयक सल्ला देखील घ्यावा. याबाबतची कार्यवाही पूर्ण करून त्यानुसार महानगरपालिकेच्या मान्यतेने घेतलेल्या निर्णयाची माहिती राज्य शासनास सादर करावी” असे नमुद केलेले आहे.

बैठकीत झालेल्या निर्णयानुसार व प्राप्त कार्यवृत्तानुसार कन्सेशनर यांना महानगरपालिकेने दिनांक ५.४.२०१६ रोजी १५ दिवस मुदतीची नोटीस पत्र क्र ०६/२०१६ दिनांक ५.४.२०१६ अन्वये दिलेली आहे. या प्रकरणी कन्सेशनर यांनी सदर नोटीसचा खुलासा त्यांचे पत्र क्र. ACWUCL/ Aurangabad/2016-17/88 दिनांक २०.४.२०१६ अन्वये महानगरपालिकेस सादर केलेला आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे चालु असलेल्या ३ जनहित याचिका प्रकरणी सुनावणी दरम्यान प्राप्त झालेल्या निर्देशानुसार आवश्यक तो विधी व वित्त विषयक सल्ला घेवून या बाबत सविस्तर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मे-२०१६ महिन्याच्या अखेरपर्यंत सादर करण्यात येणार आहे.

कन्सेशनर यांना देण्यात आलेली नोटीस व कन्सेशनर यांनी सादर केलेला खुलासा प्रत सोबत देण्यात येत आहे.

**प्रश्न क्रमांक ४५५:-**

मध्यांतरी सर्वसाधारण सभेत चर्चेदरम्यान तत्कालीन आयुक्त श्री.केंद्रेकर यांनी शहरातील नाल्याच्या जागेवरील अतिक्रमण तसेच भुमिगत गटार योजने अंतर्गत नाल्याबाधीत बांधकामे काढण्यासाठी प्रशासनास सुचना केलेली होती. परंतु त्यावर आज पर्यंत कार्यवाही झालेली दिसत नाही. संबंधीत विभागाकडुन कोणती कार्यवाही प्रस्तावित आहे? लेखी खुलासा करण्यात यावा.

इति.स.सा.सभा दिनांक १०.०५.२०१६
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२०)

**उत्तर:- उपआयुक्त (अतिक्रमण), महानगरपालिका औरंगाबाद.**

नुर कॉलनी, चेतनानगर, शिवशंकर कॉलनी, गादिया विहार या नाल्यावरील भुमिगत गटार योजनेमध्ये बाधित मालमत्ता निष्काशित करण्यात आल्या आहेत.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (जलनि:सारण प्रकल्प), महानगरपालिका औरंगाबाद.**

तत्कालीन आयुक्त यांनी निर्देशीत केल्यानुसार औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजने अंतर्गत नदी/नाला पात्रातील अडथळा ठरणारी अतिक्रमणे काढणेसाठी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून सदर पथक उप-आयुक्त प्रशासन यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे. या पथकामध्ये संबंधित पदनिर्देशीत अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांची व समवेत श्री.संजय कोंबडे क. अभियंता नगर रचना विभाग यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरील पथक पदनिर्देशीत अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली असलेल्या पोलीस पथक व कामगारासह कार्यरत असुन आतापर्यंत या पथकाने सिवर “एफ” वरील रविंद्र नगर, बालाजी नगर, शिवशंकर कॉलनी, दशमेश नगर येथील अतिक्रमणे तसेच सिवर के वरील गादीया विहार भागातील शंभु नगर येथील अतिक्रमणे काढली आहेत. तसेच जयभवानी नगर येथील सुमारे ९९ मिळकतींना प्रशासकीय विभागामार्फत अतिक्रमण हटवून घेणेसाठी नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत विविध ठिकाणी काम प्रगतीपथावर असुन आवश्यकते नुसार प्रशासकीय विभागाचे सहकार्य घेऊन अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली जात आहे.

Enchrochment Details

| Sr No | Date | Property Holder | Type of Structure | Corporator Name | Location |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2.24.2016 | Sai Shreemant Residency | Brick compound wall | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 2. | 8.3.2016 | Mr.Chandrashekhar Gade | Brick compound wall | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 3. | 11.3.2016 | Kannya Vidyalaya | Brick wall | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 4. | 3.15.2016 | Mr.Arun Pawar | Brick wall | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 5. | 3.18.2015 | Mr.Gajendra Khotkar | Brick wall, RCC Slab | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 6. | 11.4.2016 | Mr.Nagargoje | W/C Brick wall | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 7. | 11.5.2016 | Mr.Yadav | Brick compound wall | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 8. | 11.6.2016 | Mr.Kathar | Brick compound wall | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 9. | 11.7.2016 | Mr.Vilas Pawar | Brick wall, RCC Slab | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 10. | 4.13.2016 | Mr.Jagdish Tak | Stone masonary wall, Brick wall | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 11. | 4.13.2016 | Mr.Datta Shelar | Brick compound wall | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 12. | 5.4.2016 | Rose Garden Society | Brick compound wall | Mr.Wadkar | New shreya Nagar |
| 13. | 6.4.2016 | Mr.Sonawane | Brick compound wall | Mr.Wadkar | New shreya Nagar |
| 14. | 6.4.2016 | Shreyash Vidyalay | Brick compound wall | Mr.Wadkar | New shreya Nagar |
| 15. | 9.4.2016 | Mr.Pofale | Brick compound wall | Mr.Wadkar | New shreya Nagar |
| 16. | 9.4.2016 | Mr.Rathi | Brick compound wall | Mr.Wadkar | New shreya Nagar |
| 17. | 3.14.2016 | Mr.Parkhe | G+1 RCC structure | Ms.Ghogare | Shambhu Nagar |
| 18. | 5.4.2016 | Santosh Jadhav | Brick Work | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 19. | 5.5.2016 | Mr.Dahiwal | Brick Work | Mr.Nitin Salvi | Ravindra Nagar |
| 20. | 5.6.2016 | Mr.Taramoti Bhavan | Brick Work | Mr.Nitin Salvi | Balaji Nagar |
| 21. | 5.6.2016 | Mr.jawale | Brick Work | Mr.Nitin Salvi | Balaji Nagar |
| 22. | 5.6.2016 | Mr.Jawade | Brick Work | Mr.Nitin Salvi | Balaji Nagar |
| 21. | 4.29.2016 | Bakra Matan Shop | Brick Work | Mr.Nitin Salvi | Balaji Nagar |
| 22. | 5.7.2016 | Kaduba Sonavane | Brick Work | Mr.Nitin Salvi | Balaji Nagar |

**स.पालिका सदस्या श्रीमती सिमा गणपत खरात (प्रभाग क्रमांक-२८)**

**प्रश्न क्रमांक ४५६ ते ४६०:-**

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (वार्ड इ व फ), महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ४५६ | सलीम अली सरोवराचे बांधकाम करण्यासाठी खर्च किती करण्यात आला? | रक्कम रु.४,७८,६२,६१०/- खर्च झाला आहे. |
| ४५८ | सलीम अली सरोवर परिसराच्या स्वच्छतेसाठी कोणकोणत्या उपाययोजना राबविल्या? | न्यायालयाच्या आदेशानुसार सध्या नागरीकांसाठी परिसर खुला नाही. तथापि, उद्यान अधिक्षक यांचे अधिपत्याखाली तेथे देखरेखीसाठी माळी नियुक्त करण्यात आले असून उद्यान विभागातील मजुरामार्फत कालांतराने साफसफाई करण्यात येते. |
| ४५९ | सलीम अली सरोवरासाठी मनपाने एवढा केलेला खर्च वाया गेला आहे असे मनपाला वाटत नाही का? | असे म्हणणे योग्य ठरणार नाही. |
| ४६० | सलीम अली सरोवराच्या भिंतीलगत रोज रात्री पार्ट्या, मद्यपान चालते तेथील रहिवाशी आमच्याकडे तक्रारी करतात तेथे मनपाला सुरक्षा रक्षक नेमावे वाटत नाही का? | सलिम अली सरोवराच्या परिसरात तीन पाठीमध्ये सुरक्षा रक्षक तैनात करणेसाठी मुख्य लेखाधिकारी यांना अवगत करण्यात आलेले आहे. |

**प्रश्न क्रमांक ४५७:-**

विद्युत बिल व मेंटेनन्स यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला?

**उत्तर:- अप्राप्त.**

**स.पालिका सदस्य श्री.राजगौरव हरिदास वानखेडे (प्रभाग क्रमांक-५)**

**प्रश्न क्रमांक ४६१:-**

मंजुर रेखांकनात बेटरमेंट चार्जेस तसेच मनपाचे इतर चार्जेस ज्यांनी पूर्णत: महानगरपालिकेकडे भरणा केले आहेत. अशा प्लॉट धारकांना महापालिकेने सुविधा पुरविणे बंधनकारक आहे काय? या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतुद करता येते का? मागील पाच वर्षात वर्षनिहाय या कामासाठी किती तरतुद करण्यात आली होती? त्याची माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

बेटरमेंट चार्जेस म्हणजे रेखांकना अंतर्गत नागरी सुविधा जसे रस्ते, पाणी पुरवठा वाहिनी, जलनि:सारण वाहिनी आदी पुरविण्यासाठी लागणारा खर्च भूखंड धारकांकडून वसुल करण्यात येणारे शुल्क आहे. त्यामुळे या पैशातुन त्या-त्या रेखांकनात सुविधा पुरविणे अपेक्षित आहे.

अर्थसंकल्पातील आर्थिक तरतुदी बाबत लेखा विभागातर्फे माहिती उपलब्ध करुन घेणे योग्य राहील.

**प्रश्न क्रमांक ४६२:-**

मंजुर रेखांकनात बेटरमेंट चार्जेस भरणा केल्यानंतर नागरी सुविधा उपलब्ध करून देणेसाठी मा.न्यायालयाचे काही आदेश आहेत काय?

**उत्तर:- अप्राप्त.**

इति.स.सा.सभा दिनांक १०.०५.२०१६
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२०)

**स.पालिका सदस्या श्रीमती निकाळजे आशा विजय (प्रभाग क्रमांक-१३)**

**प्रश्न क्रमांक ४६३:-**

शहरातील सध्या मुलींचा जन्मदर किती आहे? किती असायला पाहिजे? १/१/२०१५ ते आतापर्यंत महिना,वार,रिपोर्टची माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

- शहरातील सध्या मुलीच्या जन्मदर १००० जन्मामागे ९१३ आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या उपलब्ध अहवालानुसार सोबत जानेवारी-२०१५ ते डिसेंबर-२०१५ व जानेवारी-२०१६ ते एप्रिल-२०१६ पर्यंतची आकडेवारी सोबज जोडुन देण्यात येत आहे.
- साधारण १००० जन्मा मागे ९५० मुलीच्या जन्म अपेक्षीत आहे.

**Aurangabad Municipal Corporation Aurangabad**
**Sex Ratio At The Time of Birth**
**Prapatre (A) Year of 2015**

| Sr.No | Month | Institutional birth | | Sex Ratio | remark |
|---|---|---|---|---|---|
| | | Male | Female | | |
| 1. | Jan-2015 | 2666 | 2520 | 94.52% | |
| 2. | Feb-2015 | 2535 | 2323 | 91.63% | |
| 3. | Mar-2015 | 1329 | 1150 | 86.53% | |
| 4. | Apr-2015 | 1467 | 1246 | 84.94% | |
| 5. | May-2015 | 1990 | 1832 | 81.06% | |
| 6. | Jun-2015 | 2691 | 2416 | 89.78% | |
| 7. | July-2015 | 2132 | 1929 | 90.47% | |
| 8. | Aug-2015 | 1398 | 1231 | 88.05% | |
| 9. | Sep-2015 | 2247 | 2204 | 98.08% | |
| 10. | Oct-2015 | 2159 | 1936 | 89.67% | |
| 11. | Nov-2015 | 1981 | 2012 | 101.56% | |
| 12. | Dec-2015 | 2325 | 1943 | 83.56% | |
| **Total** | | **24920** | **22742** | **91.26%** | |

**Aurangabad Municipal Corporation Aurangabad**
**Sex Ratio At The Time of Birth**
**Prapatre (A) Year of 2016**

| Sr.No | Month | Institutional birth | | Sex Ratio | Not Recived Report |
|---|---|---|---|---|---|
| | | Male | Female | % | |
| 1. | Jan-2016 | 701 | 642 | 92.00% | Ward-A,F,Satara,Deolai |
| 2. | Feb-2016 | 207 | 205 | 99.00% | Ward-A,B,C,F,Satara,Deolai |
| 3. | Mar-2016 | 0 | 0 | 0.00% | Ward-A To F & Satara,Deolai |
| 4. | Apr-2016 | 0 | 0 | 0.00% | Ward-A To F & Satara,Deolai |
| 5. | May-2016 | | | | |
| 6. | Jun-2016 | | | | |
| 7. | July-2016 | | | | |
| 8. | Aug-2016 | | | | |
| 9. | Sep-2016 | | | | |
| 10. | Oct-2016 | | | | |
| 11. | Nov-2016 | | | | |
| 12. | Dec-2016 | | | | |
| **Total** | | | | | |

**प्रश्न क्रमांक ४६४ ते ४६६:-**

**उत्तर:- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

**प्रश्न क्रमांक ४६४ :-**

एम.सी.टी.एस.नोंदणी १/१/२०१५ ते आतापर्यंत किती झालेली आहे? या बद्दलचा महिना, वार, रिपोर्टची माहिती देण्यात यावी.

**उत्तर:-**

एम.सी.टी.एस.मध्ये मागील सन-२०१५ ते सन-२०१६ मध्ये एकूण ३२,७२९ मातांची नोंदणी केलेली आहे. महिनावार साधारणत: सर्व आरोग्य केंद्र व रूग्णालय मिळून २७२८ मातांची प्रत्येक महिन्यात नोंदणी केली जाते.

**प्रश्न क्रमांक ४६५:-**

एम.सी.टी.एस.नोंदणी सुरु आहे किंवा नाही? माहिती देण्यात यावी.

**उत्तर:-**

सर्व केंद्रावर एम.सी.टी.एस.सुरु आहे.

**प्रश्न क्रमांक ४६६ :-**

एम.सी.टी.एस.नोंदणी बंद असल्यास काय कारण आहे? या बद्दलची माहिती देण्यात यावी.

**उत्तर:-**

एम.सी.टी.एस. नोंदणीकरत असतांना इंटरनेट कनेक्टीव्हीटी मध्ये काही तांत्रिक अडचण येतात, त्यामुळे काही वेळ पी.सी. बंद असतो. अशा वेळी पेशंटची नोंदणी रजिस्टरमध्ये करून घेतली जाते व नंतर इतर आरोग्य केंद्रात जावून तेथील कॉम्प्युटरवर बसुन नोंदणी केली जाते. त्या नोंदणीचा एस.एम.एस. सदरील मांतेच्या मोबाईल नंबरवर जातो.

**स.पालिका सदस्य श्री.गंगाधर नामदेव ढगे (प्रभाग क्रमांक-४९)**

**प्रश्न क्रमांक ४६७:-**

महात्मा गांधी मिशन एन-६, सिडको (संस्था) वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्याकडे महानगरपालिकेचा थकीत मालमत्ता कर किती आहे? थकीत मालमत्ता करावर व्याज आकारण्यात येते त्या प्रमाणे एम.जी.एम.संस्थेच्या मालमत्ता करावर व्याज आकारण्यात आले आहे का?

**उत्तर:- वार्ड अधिकारी (वार्ड-फ), महानगरपालिका औरंगाबाद.**

मालमत्ताधारक सचिव महात्मा गांधी मिशन एन-६, औरंगाबाद यांनी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापर्यंत रु.९०,७८,१७७/- एवढया रक्कमेचा भरणा केलेला असुन संबंधिताकडे रु.५,७५,७९५/- एवढा चालु वर्षाचा कर बाकी आहे. तसेच संबंधित मालमत्ताधारकाकडे चालु मागणी असल्यामुळे त्यावर विलंब शुल्क हा जुलै-२०१६ पासुन २ टक्के प्रमाणे आकारण्यात येतो.

**उत्तर:- उप-आयुक्त तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद.**

महात्मा गांधी मिशन एन-६, सिडको संस्था वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद यांनी सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षापर्यंत रु.९०,७८,१७७/- एवढया रक्कमेचा भरणा केलेला असुन संबंधिताकडे रु.५,७५,७९५/- एवढा चालु वर्षाचा कर बाकी आहे. तसेच संबंधित मालमत्ताधारकाकडे चालु मागणी असल्यामुळे त्यावर विलंब शुल्क हा जुलै-२०१६ पासुन २ टक्के प्रमाणे आकारण्यात येतो.

**प्रश्न क्रमांक ४६८ ते ४६९:-**

**उत्तर:- मुख्य अग्निशमन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ४६८ | महात्मा गांधी मिशन एन-६, सिडको (संस्था) वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांनी अग्निप्रतिबंधक व जीव सुरक्षा योजनांचे काम कोणत्या अधिकरणाकडून (एजन्सी) कडुन घेण्यात आले त्यांचे नाव, पत्ता काय आहे? | शहरातील महात्मा गांधी मिशन संस्था एन-६, सिडको वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अग्नि प्रतिबंधक व जीव सुरक्षा योजनाचे काम रुद्राणी फायर सर्व्हिसेस या महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त फायर एजन्सीकडून करून घेण्यात आले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४६९ | महात्मा गांधी मिशन एन-६, सिडको (संस्था) वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेच्या किती इमारती आहेत? इमारतनिहाय अग्निप्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाय योजना केली आहे का? असल्यास अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र घेतले आहे का? त्याचा दिनांक काय आहे? | शहरातील महात्मा गांधी मिशन संस्था एन-६, सिडको वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची १ व शैक्षणीक संस्थेच्या ०९ अशा एकूण १० इमारती आहेत. इमारत निहाय अग्नि प्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाय योजनाचे काम पुर्ण करण्यात आले आहे व ऊर्वरित काम अंतिम टप्यात आहे. दिनांक २२.०५.२०१५ या रोजी अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. |

**प्रश्न क्रमांक ४७० ते ४७१:-**

**उत्तर:- उपआयुक्त (प्रशासन), महानगरपालिका औरंगाबाद.**

**प्रश्न क्रमांक ४७०:-**

महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांच्या बँड पथकासाठी मागील दोन वर्षामध्ये किती निधी देण्यात आला?

**उत्तर:-**

मागील दोन वर्षामध्ये बँड पथकासाठी रु.८७१००/- एवढा निधी अग्रीम स्वरुपात देण्यात आला आहे.

**प्रश्न क्रमांक ४७१:-**

महानगरपालिका क्रिडा विभागामध्ये क्रिडा साहित्य खरेदी करण्याकरीता किती निधी ठेवण्यात आला?

**उत्तर:-**

महानगरपालिकेच्या क्रिडा विभागामध्ये क्रिडा साहित्य खरेदी करण्याकरीता सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.१.०० कोटी निधी ठेवण्यात आला.

**स.पालिका सदस्य श्री. कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद (प्रभाग क्रमांक-१९)**

**प्रश्न क्रमांक ४७२:-**

सन-२०१४ ते आजपर्यंत किती पोल व किती फिटींग काढण्यात आली आहे? त्याची माहिती द्यावी. ते कोठे ठेवण्यात आले आहे? त्याची माहिती लेखी स्वरुपात द्यावी.

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक ४७३:-**

उपअभियंता, विद्युत विभागाने मागील ४ वर्षात किती कामे केली? याची माहिती द्यावी.

**उत्तर:- अप्राप्त.**

**स.पालिका सदस्या श्रीमती खान सायरा बानो अजमल (प्रभाग क्रमांक-२३)**

**प्रश्न क्रमांक ४७४ :-**

औरंगाबाद महानगरपालिका मध्ये धार्मिक स्थळे जसे मस्जिद,मंदिर,चर्च,गुरुद्वारा इत्यादीसाठी रितसर बांधकाम परवानगी साठी कोणती कोणती कागद पत्रे कोणकोणत्या विभागाचे नाहरकत प्रमाण पत्र घेणे आवश्यक आहे? सदर कागदपत्रासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, बांधकाम परवानगी व विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीचे कलम, नियम, पोटनियम, इत्यादी ची माहिती देण्यात यावी.

तसेच विकास योजनेच्या वाणिज्य औद्योगिक झोन मध्ये यासाठी परवानगी घेता येते का? इत्यादी तपशील देण्यात यावा.

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत धार्मिक स्थळाबाबत स्वतंत्र उल्लेख नाही. मात्र या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरीक जमा होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्याला Assembly Bulading या वर्गात वर्गवारी करावी लागेल. त्यासाठी नियम क्रमांक २.५५.४ वर नोंद आहे.

**प्रश्न क्रमांक ४७५:-**

महानगरपालिकेला प्रशासकीय अहवाल पसिध्द करणे/सर्वसाधारण सभेमध्ये/स्थायी समिती पुढे ठेवणे बंधनकारक आहे का? असल्यास केव्हा ठेवावे लागतात? किती वर्षापासून अहवाल ठेवण्यात आलेले नाही? त्याची कारणे काय? याबाबत माहिती देण्यात यावी.

**प्रश्न क्रमांक ४७६:-**

शहागंज पाण्याच्या टाकीलगत अग्निशमन उपकेंद्र सुरु करण्यासाठी जुन्या शहराची गरज लक्षात घेता तत्कालीन आयुक्त श्री.सुनिल केंद्रेकर आणि सध्याचे मनपा आयुक्त मा.श्री.ओमप्रकाश बकोरीया यांच्या शहागंज पाणीटाकी येथील भेटीत अग्निशमन उपकेंद्र तातडीने सुरु करण्याबाबत दिलेले आश्वासना बद्दल काय कार्यवाही करण्यात आली आहे? नसल्यास विलंबाची कारणे काय? जागेच्या तपशीलासह सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- मुख्य अग्निशमन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

शासन निर्णय नगरविकास विभाग, मंत्रालय, क्र.अशस १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२०, दिनांक ३१.०८.२००९ अन्वये औरंगाबाद शहरासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत एकूण आठ अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे. त्यापैकी सध्या तीन अग्निशमन केंद्र सुरु असून पाच अग्निशमन केंद्र तयार करण्याचे काम प्रस्तावित केलेले आहेत. यामध्ये शहागंज पाण्याची टाकी येथे अग्निशमन केंद्र तयार करण्याचे ही प्रस्तावित आहे.

अग्निशमन विभागात तीन अग्निशमन केंद्रासाठी एकूण पदसंख्या ८१ होती. सध्या तीन अग्निशमन केंद्रासाठी अग्निशमन अधिकारी/कर्मचारी फक्त ५४ पदसंख्या असून खुपच अपूरी आहे. एका अग्निशमन वाहनावर सहा कर्मचारी संख्या आवश्यक असतांना सध्या तीनच कर्मचारी काम करीत आहे.

तरी शहागंज पाण्याची टाकी येथे उप-अग्निशमन केंद्र स्थापन करण्यासाठी मा.शहर अभियंता यांच्याकडे सदरील ठिकाणचे दुरुस्ती बांधकाम करण्यासाठी दिनांक १०.०३.२०१६ रोजी पत्र देण्यात आलेले आहे. अग्निशमन अधिकारी/कर्मचारी संख्या अपूरी असल्यामुळे सध्या शहागंज येथे उप-अग्निशमन केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही करता येत नाही.

**स.पालिका सदस्या श्रीमती संगिता सुभाष वाघुले (प्रभाग क्रमांक-३४)**

**प्रश्न क्रमांक ४७७:-**

शहरात एकुण महानगरपालिकेच्या मराठी माध्यमाच्या व ऊर्दु माध्यमाच्या किती शाळा आहेत? तसेच प्रत्येक शाळे प्रमाणे पहिली ते दहावी पर्यंतच्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या किती? व प्रत्येक शाळेला मराठी माध्यमाचे व ऊर्दु माध्यमाचे कितवी पर्यंत वर्ग आहेत? तसेच कायमस्वरुपी शिक्षक, शिक्षिका व मुख्याध्यापक किती आहेत? तसेच तासिका तत्वावर शिक्षक, शिक्षिका यांची एकुण संख्या किती आहे? प्रत्येकी कायमस्वरुपी शिक्षक, शिक्षिका तसेच मुख्याध्यापक व तासिका तत्वावर शिक्षक, शिक्षिका यांच्या संपूर्ण नावानिशी व शाळेनिशी माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- उपआयुक्त (प्रशासन), महानगरपालिका औरंगाबाद.**

| अ.क्र | विचारलेली माहिती | उत्तर |
|---|---|---|
| १. | महानगरपालिकेच्या मराठी व उर्दु माध्यामांच्या शाळांची एकुण संख्या | ७० |
| २. | मराठी शाळांची संख्या | ५२ |
| ३. | उर्दु शाळांची संख्या | १८ |
| ४. | द्विभाषिक शाळांची संख्या | ०७ |
| ५. | एकुण विद्यार्थी संख्या (१ ते १०) | १४५४४ |
| ६. | शाळेतील उर्दु / मराठी माध्यामांचे वर्ग | तक्ता सोबत जोडण्यात आला आहे. |
| ७. | मुख्याध्यापक संख्या | ३६ |
| ८. | सह शिक्षक संख्या | ४२२ |
| ९. | तासिका शिक्षकांची संख्या | ४६ |
| १०. | मु.अ.सहशिक्षक व तासिका तत्त्वावरील शिक्षकांचे नांव शाळा निहाय माहिती | तक्ता सोबत जोडण्यात आला आहे. |

**शिक्षण विभाग**

**केंद्रनिहाय शाळांची यादी**

**दिनांक ०१/०६/२०१६ सुधारित यादी**

| अ.क्र. | केंद्रिय शाळेचे नाव | माध्यम | मुख्याध्यापक/प्रभारी मु.अ. | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|---|
| १ | **कें.प्रा शा.बेगमपूरा** | मराठी | देविदास वाहूळ | ९४२३४४८३७९ |
| २ | प्रा शा.भावसिंगपूरा | मराठी | उषा काळवे | ९८८१२३३३४८ |
| ३ | प्रा शा.पडेगांव | मराठी | लता खंदारे | ७५८८४०२८४३ |
| ४ | प्रा शा.पडेगांव कॉलनी | मराठी | जिजाबाई लोंढे | ८२३७०१८०५५ |
| ५ | प्रा शा.मिटमिटा | मराठी | रुपाली हिवाळे | ९४२१३०६२४१ |
| ६ | प्रा शा.आरेफ कॉलनी | उर्दु | नाज फिरदोस | ९०२८९७९६६४ |
| ७ | **नु.मा.शा.ज्युबलीपार्क** | **मराठी/उर्दु** | शेख रफिक | ९४२३१५४४१४ |
| ८ | प्रा शा.बडी गिरणी | मराठी/उर्दु | सविता प्रेमल्लु | ९३७२३४३०४३ |
| ९ | प्रा शा.मंजूरपूरा | उर्दु | नाजनीन परवीन | ७७०९२३४४७८ |
| १० | प्रा शा.जुना बाजार (ब.म) | मराठी | शेख मजहर शहामीर | ९१७५४३१६२८ |
| ११ | प्रा शा.पोलीस हेड कवार्टर | मराटी | - | - |
| १२ | प्रा शा.नागेश्वरवाडी | मराठी | स्मिता कुलकर्णी | ९९२३३५२९५५ |
| १३ | **कें.प्रा शा.किराडपूरा नं.१ (उर्दू)** | **उर्दु** | शहेनाज परवीन | ९९७५८४८०१५ |
| १४ | प्रा शा.किराडपूरा नं.२ | उर्दु | चांद सुलताना | ८०५५३२०८६८ |
| १५ | प्रा शा.किराडपूरा नं.३ | मराठी/उर्दु | सरोज शुक्ला | ९०११७३१२०२ |
| १६ | प्रा शा.चेलीपूरा | उर्दु | रशिदुन्निसा मो.युसूफ | ९७६३०८६३१८ |
| १७ | प्रा शा.यशोधरा कॉलनी | उर्दु | ताहेरा बेगम | ७२७६४९५९८९ |
| | प्रा शा.यशोधरा कॉलनी | मराठी | शोभा पवार (सोनखेडे) | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | प्रा शा.शहाबाजार | उर्दु | कैसर बेगम | ९४२३१६८७९५ |
| १९ | **कें.प्रा शा.सिडको एन १२** | **मराठी** | निशा कुलकर्णी | ९४०३६३७६४८ |
| २० | प्रा.शा. सिडको एन-९ | मराठी | रत्नप्रभा बहाळकर | ९९६०४६९५५५ |
| २१ | प्रा शा.एन ११ | मराठी | पवार मीरा सांडू | ९४०३६३७६४८ |
| २२ | प्रा शा.रोजाबाग | उर्दु | तौफिक जहाँ | ८४४६७०६५६६ |
| २३ | प्रा शा.एन.६ | मराटी | दिपक कुदळ | ९४०४९८८६६८ |
| २४ | प्रा शा.गणेश कॉलनी | उर्दु | आसिया सुलताना | ८२७५००३४५५ |
| २५ | प्रा शा.शताब्दीनगर | मराठी | समीना बेगम | ९४२१०६३७०४ |
| २६ | **कें.प्रा शा.सिडको एन.७** | **मराठी** | हेमलता भुयार | ९४२२७०९१९२ |
| २७ | प्रा शा.अशोकनगर | मराठी | आर. टी. मुंढे | ८४२१२६०८८९ |
| २८ | प्रा शा.ब्रिजवाडी | मराठी | जगन्नाथ सपकाळ | ७२७६३५६६१५ |
| २९ | प्रा शा.नारेगांव (मराठी) | मराठी | माणिक निबांळकर | ९४२२७०९७९७ |
| ३० | प्रा शा.नारेगांव (उर्दु) | उर्दु | शेख अब्दुल रहिम | ९३२५२१३६९५ |
| ३१ | प्रा.शा.मिसारवाडी | मराठी | एस.पी.जोगदंड | ७५८८८११३१८ |
| ३२ | **कें.प्रा.शा.मुकूंदवाडी** | **मराठी** | संतोष तपकिरे | ९७६४५९१५५५ |
| ३३ | प्रा शा.चिकलठाणा | मराठी | ज्योती फडके | ९७६५५४३९६० |
| ३४ | प्रा शा.संजयनगर | मराठी | उर्मिला लोहार | ८००७८८६७७७ |
| ३५ | प्रा शा.विठ्ठलनगर | मराठी | वंसत राठोड | ९४२१६८१३८४ |
| ३६ | प्रा शा.भारतनगर नं.२ | मराठी | सुभाष सांवत | ९४२३७४१३२४ |
| ३७ | प्रा शा.विश्रांतीनगर | मराठी | - | - |
| ३८ | **कें.प्रा.शा.प्रियदर्शनी इंदिरानगर** | **मराठी** | सोनार संजीव | ९८२३०४२७५६ |
| ३९ | प्रा.शा.प्रियदर्शनी इंदिरानगर | उर्दु | सोहेल खान | ९८२३०४२७५६ |
| ४० | प्रा शा.भारतनगर नं.१ | मराठी | सुभाष शिंदे | ८१४९२९४९१७ |
| ४१ | प्रा शा.न्यू हनुमान नगर | मराठी | गजानन शिरसाठ | ९६५७०८००८९ |
| ४२ | प्रा शा.एकनाथनगर | मराठी | शोभा निकम | ९०४९७०३२६८ |
| ४३ | प्रा शा.गारखेडा | मराठी/उर्दु | प्रतिभा कुलकर्णी | ९४०३४०६८७१ |
| ४४ | प्रा.शा.जवाहर कॉलनी | मराठी | क्रांती देशमुख | ९८५०००४५३९ |
| ४५ | प्रा.शा विष्णूनगर | मराठी | आसाराम जाधव | ९४२१६९२१०० |
| ४६ | **कें.प्रा शा.बन्सीलालनगर** | **मराठी/उर्दु** | अलका भडके | ८२७५३२१७९४ |
| ४७ | प्रा शा.पदमपूरा | मराठी | विद्या चौधरी | ८०८७५२८७३७ |
| ४८ | प्रा शा.सील्कमील कॉलनी | उर्दु | रिजवाना बेगम | ७५८८८१२२५७ |
| ४९ | प्रा शा.शहासोख्ता कॉलनी | उर्दु | अलमास जोहरा | ८१८००४५८०५ |
| ५० | प्रा.शा.शहानूरवाडी | मराठी | भावना अंदुरकर | ८०८७४९०३६१ |
| ५१ | प्रा.शा.मुलींची उस्मानपूरा | मराठी | दिपक पारधे | ९६७३०४१७८९ |
| ५२ | प्रा शा.सिल्लेखाना | उर्दु | सबिना परवीन | ९१७५७८४२५० |
| ५३ | प्रा शा.नूतन कॉलनी | मराठी | सुनिता तनपुरे | ९७६२९७८८७८ |
| ५४ | प्रा शा.समतानगर | उर्दु | चिश्ती रुमाना | ८४२१३०५५४० |
| ५५ | **कें.प्रा शा.इंदिरानगर बायजीपूरा** | **मराठी** | मंगला एलकटवाड | ९४२१६७३३७० |
| ५६ | प्रा शा.जिन्सी / रेंगटीपूरा | मराठी / उर्दु | विजय कोल्हे | ९८६०६१५७०९ |
| ५७ | प्रा शा.रोहिदासपूरा | मराठी | सदर खान | ९१६८००८८११ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५८ | प्रा शा.कैलासनगर | मराठी | निर्मला काचोळे | ९१५८८१९१७२ |
| ५९ | प्रा शा.खोकडपूरा | मराठी | कल्पना काथार | ०२४०-२३५५५८८ |
| ६० | प्रा शा.पैठणगेट | उर्दु | शेख मुमताज बेगम | ९४२०३९५१६६ |
| ६१ | **के.प्रा शा.हर्सूल गांव (म.)** | **मराठी** | संगीता ताजवे | ९६५७१३८९०६ |
| ६२ | प्रा शा.हर्सूल (उर्दू) | उर्दु | जहुरुन्निसा बेगम | ९६६५५५०८१२ |
| ६३ | प्रा शा.हर्सूल वसाहत | मराठी | थोरे रामनाथ | ८२७५९४२००५ |
| ६४ | प्रा शा.हर्सुल सेन्ट्रल जेल | मराठी | पुष्पा वनारसे | ९४२१६४१९७९ |
| ६५ | प्रा शा.मुजफफरनगर | उर्दु | अ. अजीम अ. करीम | ९७३०३९९३१८ |
| ६६ | **के.प्रा.शा. बनेवाडी** | मराठी | भारत तिनगोटे | ८२७५२३८७३६ |
| ६७ | प्रा शा.विटखेडा | मराठी | शिंदे पी.पी. | ७७९८१९१८८८ |
| ६८ | प्रा शा.नक्षत्रवाडी | मराठी | देवेंद्र सोळूंके | ७३५०४४६८५५ |
| ६९ | प्रा शा.कांचनवाडी | मराठी | रेखा देबाजे | ९९७०५८४२६८ |
| ७० | प्रा शा.वाल्मी | मराठी | साळुंके बी.एम | ८२७५२३८९३९ |

**मराठी माध्यम -४५**
**उर्दु माध्यम -१८**
**व्दिभाषीय -०७**
**एकुण -७०**

| **अ.क्र.** | **शाळेचे नाव** | **तासिका तत्वावरील शिक्षकांचे नाव** |
|---|---|---|
| १. | मा.वि. बेगमपुरा | श्री.तेहरीम शे.बाबर |
| २. | मा.वि. बेगमपुरा | श्री.संघवी रविंद्रकुमार जिनदास |
| ३. | मा.वि. मिटमिटा | श्री.म्हेत्रे निलेश मधुकर |
| ४. | मा.वि. हर्सुल (म.) | श्री.हिरेकर सुनिल दौलतराव |
| ५. | मा.वि.किराडपुरा नं.१ | श्रीमती शेख मावीया तबस्सुम शे.नजमुद्दिन |
| ६. | मा.वि.किराडपुरा नं.१ | श्रीमती सय्यदा शाहीन अंजुम तौफिक अली |
| ७. | मा.वि. हर्सुल (म.) | श्रीमती पवार किरण भारत |
| ८. | मा.वि. सिडको एन-७ | श्रीमती राठोड मंजुश्री गणपतराव |
| ९. | मा.वि. सिडको एन-७ | श्रीमती देशमुख वैशाली दिनकर |
| १०. | मा.वि. सिडको एन-७ | श्री.उमेश अशोक गायकवाड |
| ११. | मा.वि.नारेगांव | श्रीमती पाटील वैशाली कैलास |
| १२. | के.प्रा.शा. बेगमपुरा | श्री.पठाण जावेद खान साहेब खान |
| १३. | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती ढोबळे राखी राम |
| १४. | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती मनिषा बळीराम शिंदे |
| १५. | मा.वि. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती कुऱ्हाडे सुमन संतोष |

| | | |
|---|---|---|
| १६. | मा.वि. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती चौधरी संगीता लक्ष्मण |
| १७. | मा.वि. बन्सीलालनगर | श्री.काकडे राहिदास समुरलीधर |
| १८. | मा.वि. बनेवाडी | श्री.उन्हाळे प्रकाश भगवान |
| १९. | मा.वि. मिटमिटा | श्री.नन्नवरे श्रीकांत सोमकांत |
| २०. | मा.वि. बनेवाडी | श्री.भुतेकर भाग्येश्वर श्रीकिशन |
| २१. | मा.वि. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती वामन सरीता रामकृष्ण |
| २२. | मा.वि. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती. जंजाळ उज्वला परसराम |
| २३. | मा.वि. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती रेखा दशरथ महाजन |
| १. | मा.वि. बेगमपुरा | श्रीमती सुलाखे नीलीमा |
| २. | मा.वि. मिटमिटा | श्री. म्हस्के दिनेश जगन्नाथ |
| ३. | मा.वि. मिटमिटा | श्रीमती खरात नीता मोतीराम |
| ४. | मा.वि. किराडपुरा नं.१ | श्री. खान शहबाज खुदायार खान |
| ५. | मा.वि. किराडपुरा नं. १ | श्री. शेख जफर |
| ६. | मा.वि. शहाबाजार | श्रीमती कुरैशी फातेमा |
| ७. | मा.वि. शहाबाजार | श्रीमती सय्यदा फरकुंदा स. इलियास |
| ८. | मा.वि. शहाबाजार | श्रीमती पटेल हुमैरा अ.बारी |
| ९. | मा.वि. सिडको एन-७ | श्री. जाधव व्यंकट भिमराव |
| १०. | मा.वि. नारेगांव | श्री. श्रीकांत किसनराव शिंदे |
| ११. | मा.वि. नारेगांव | श्री. मिर्झा अजमल बेग |
| १२. | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती सुरेखा द. आक्षे |
| १३. | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती पट्टेबहादुर अर्चना नामदेव |
| १४. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्री. इंगळे प्रकाश विष्णु |
| १५. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती जाधवर सुर्यमाला महादेव |
| १६. | मा.वि. बन्सीलालनगर | श्रीमती काळे मनिषा रंगनाथ |
| १७. | मा.वि. बन्सीलालनगर | कु. भडके ताई नारायण |
| १८. | मा.वि. नारेगांव | श्रीमती फलंब्रीकर अरुणा प्रभाकर |
| १९. | मा.वि.बनेवाडी | श्री. सोनवणे राजेंद्र कडुबा |
| २०. | मा.वि. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती चव्हाण शुभांगी बलभिमराव |
| २१. | मा.वि. हर्सुल (म.) | श्री. मोकळे संजय शंकर |
| २२. | मा.वि. हर्सुल (म.) | श्रीमती भिलेगांवकर प्रेरणा |
| २३. | मा.वि. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती कुलकर्णी स्वाती प्रल्हादराव |

इति.स.सा.सभा दिनांक १०.०५.२०१६
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२०)

**प्रश्न क्रमांक ४७८:-**

गत वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे मिसरवाडी भागामध्ये घराघरात पाणी शिरले होते, त्यामुळे नागरीकांचे नुकसान झाले होते. याही वर्षी मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. महानगरपालिकेच्या वतीने मिसरवाडी, आरती नगर या भागात किती नाल्यांची पाहणी करण्यात आली आहे? व किती नाल्यावरील अतिक्रमणे आतापर्यंत काढण्यात आले आहे? याची माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- उपअभियंता (वार्ड-ब), महानगरपालिका औरंगाबाद.**

आरतीनगर, मिसारवाडी भागातील दोन नाल्यांची पाहणी करण्यात आली आहे. येथील बांधीव नाल्यामध्ये कोणतेही अतिक्रमण नाही. ऊर्वरीत नाला भागात भुमीगत गटार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम करण्यात आले आहे. ड्रेनेज लाईनचे काम करतांना नाला प्रवाहास अडथळा ठरणारी बहुतांश अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. मान्सुनपुर्व नाला सफाई करीता यांत्रिकी विभाग मार्फत जे.सी.बी. उपलब्ध होणार आहे. यांत्रिकी विभागामार्फत जे.सी.बी. उपलब्ध झाल्या नंतर नाला सफाई करतांना नाला प्रवाहास अडथळा ठरणारी ऊर्वरीत अतिक्रमणे काढण्यात येतील.

**प्रश्न क्रमांक ४७९:-**

वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसरवाडी अंतर्गत नगररचना विभागाने किती बिल्डरांना बांधकाम परवानगी दिलेली आहे? त्या बाबतची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

बांधकाम परवानगीचा अभिलेख हा वॉर्ड निहाय राखला जात नाही. त्यामुळे अशा प्रकारे माहिती देता येणे अवघड आहे. मात्र या पत्रासोबत मागील पाच वर्षात देण्यात आलेल्या सर्व बांधकाम परवानगीची माहिती सी.डी. स्वरुपात देण्यात येत आहे.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.